
साप्ताहिक

# माणूस

१० डिसेंबर ८३ / दोन रुपये



## पर्यावरण विशेषांक : एक

With Best Compliments From

**The West-Coast Paper Mills Limited**

Bangur Nagar, Daudeli-581362

( Dist. : Uttarkanada )

With Best Compliments From

**M/s. Marine Containers & Serveyer**

BOMBAY

साप्ताहिक

# माणूस

□

वर्ष : तेविसावे

अंक : अठ्ठाविसावा

□

१० डिसेंबर १९८३

किंमत : दोन रुपये

□

संपादक

श्री. ग. माजगावकर

□

साहाय्यक

दिलीप माजगावकर

सौ. निर्मला पुरंदरे

मेधा राजहंस

□

वार्षिक वर्गणी

पन्नास रुपये

□

प्रकाशित लेख, चित्रे इत्यादीबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी चालक सहमत असतीलच असे नाही.

□

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव, पुणे येथे छापून तेथेच संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले.

□

: पत्ता :

साप्ताहिक माणूस

१०२५ सदाशिव, पुणे ३०

दूरध्वनी : ४४३४५९

□

मुखपृष्ठ

संजय पवार

□

अंकातील झाडांची चित्रे

डॉ. अनिल अवचट

# आपलाही सहभाग हवा !

एखाद्या विषयाकडे लक्ष वेधलं जाण्याची दोन कारण असतात. एक तर तो विषय सर्वसामान्य माणसांकडून पूर्ण दुर्लक्षित असतो किंवा त्याच्याकडे विशेष लक्ष पुरवलेलं असत. पर्यावरण विशेषाक काढण्यामागे पहिल कारण आहे.

आपल्या आजूबाजूच्या परिस्थितीचा जवळून विचार करण्याची गरज तशी कोणालाच भासत नाही. औद्योगीकरणाच्या सुईचे साइडइफेक्टस् जेव्हा आपल्या घरात पोचतात तेव्हा खडबडून जागं होण्याशिवाय पर्याय नसतो. आज शहरी विभागात ही वेळ आली आहे आणि खेडी शहरांपासून फार दूर नाहीत.

आपल्या सगळ्यांना वेढू शकणाऱ्या या गंभीर समस्येच्या विरोधात उभे राहणाऱ्यांची संख्या आज मात्र अगदीच अलक्षणीय आहे. सरकारी पातळीवर राबवले जाणारे वृक्षरोपणाचे कार्यक्रम, पक्षी-प्राण्यांसाठी अभयारण्याचे काही नवे प्रकल्प आणि पर्यावरणाशी नातं सांगणाऱ्या काही समाजसेवी–स्वयंसेवी संघटनांचा हातभार वगळता तुमच्या-आमच्यापर्यंत हा प्रश्न पोचतच नाही. या पर्यावरण विशेषांकात हा प्रश्न तुमच्यापर्यंत पोचवण्याचा प्रयत्न केला आहे. पर्यावरणासंबंधीच्या बहुतेक प्रश्नांचा विचार या अंकात आहे.

वातावरण-पक्षी–प्राणी–वनं यासारख्या नैसर्गिक संपत्तीच संतुलित पर्यावरणाच्या संदर्भातील महत्त्व आणि त्यांचं रक्षण हे जितकं महत्त्वाचं आहे तितकच औद्योगीकरणही महत्त्वाचं आहे. प्रश्न आहे या दोन्हींचा सुयोग्य मेळ घालण्याचा. सरकारी पातळीवर हे नियोजन होऊ शकेल असा विश्वास बाळगण चुकीचं आहे. त्यासाठी गरज आहे व्यक्तिगत पातळीवर जागरूक असण्याची आणि वेळप्रसंगी याविरुद्ध लढा देण्यासाठी संघटित होण्याची !

संघटित प्रयत्नाचं यश 'साग–साल,' 'चिपको', 'सायलंट व्हॅली' यासारख्या आंदोलनानी दाखवून दिलं आहे. तसंच व्यक्तिपातळीवर दिलेल्या लढ्यातील फोलपणा या अंकातील लेड–पॉयझनिंगच्या प्रत्यक्ष घटनेवरून दिसून येईल.

अगदी आपल्याजवळची गोष्ट–पुणे विद्यापीठाच्या संदर्भातली. नव्या नियोजित इमारतीच्या बांधकामासाठी विद्यापीठ परिसराची हानी होईल हे लक्षात येताच परिसरप्रेमींनी याविरुद्ध दिलेला उत्स्फूर्त यशस्वी लढा हे जागरूक संघटित प्रयत्नाचं एक चांगलं उदाहरण आहे.

'पर्यावरण वाचवा' मोहिमेत म्हणूनच आता स्वत हून सामील होण्याची ही वेळ आहे.


□

विशेषांक काढण्याची कल्पना निश्चित झाल्यावर पर्यावरणासंबंधीच्या अनेक बाजूंवर त्या त्या क्षेत्रातील तज्ज्ञांनी दिलेल्या चांगल्या प्रतिसादामुळं एका विशेषांकाचे दोन अंक करावे लागत आहेत. 'माणूस'चा यापुढील अंकही याच विषयावर असेल.

मी पार चक्रावून गेलो.
काय करायला आलो आणि काय झालं होतं.
समोर मंगा-पुसू होते.
कदाचित मी–शेखरही असतो
कदाचित अस्वलही असते.
तकदीरच्या जाळ्यामध्ये कोण कसं फसेल
काय सांगावं ?
मी सुन्नपणे पहातच होतो...

●

जगदीश गोडबोले



# पारध

⊟

'**पा**रध' म्हणजे शिकार, पण चंद्रपूर–बस्तरच्या आदिवासी माडिया गोंडासाठी पारध म्हणजे केवळ मासासाठी केलेली शिकार नाही, वा चामडी–शिंगांसाठी केलेला शौक नाही तर तो त्यांच्या देव–देवतांच्या पूजा–विधीचा एक भाग आहे. निसर्गजीवनाचे एक अविभाज्य अंग आहे. माडिया–गोंड ते प्राणपणाने जपतात...मानतात... पूजतात.

◘

केंद्र सरकारच्या पर्यावरणविभागातर्फे दोन वर्षापूर्वी मध्य–प्रदेशातील बस्तरच्या आदिवासी विभागात एका अभ्यास–पहाणीसाठी गेलो होतो. सोबतीला माझा हिदुर–नागेपल्लीचा दोस्त शेखर होता.

'बस्तरी' म्हणजे बांबूचे घनदाट राज्य. बस्तरला बस्तरीपासून हे नाव मिळाले असले, तरी बस्तरमध्ये बांबूच्या जोडीला सालवृक्षाचेही देखणे जंगल आहे. स्थानिक माडिया–मुरियांचे सलगीचे झाड म्हणजे साल ऊर्फ सरगी. त्यांचे सर्व जीवनच सरगीशी गुंफलेले आहे. सरगीवर त्यांची माया आहे. सरगीची त्यांच्यावर !

पण ही माया बाहेरच्या जगाच्या दृष्टीने कवडीमोल आहे, किरकोळ आहे. व्यापारी-दृष्टचा सालवृक्षाची किंमत फारशी नाही. त्यापेक्षा पैशाची माया मोठी आहे. म्हणूनच मध्यप्रदेश सरकार सालचे हरे–भरे उभे 'किरकोळ' जंगल साफ करून त्या जागी व्यापारीदृष्टचा अधिक किफायतशीर चीड-वृक्षाच्या मूल्यवान जंगलाची लागवड करणार होते. तशी महत्त्वाकांक्षी योजना आखण्यातही आली होती. आदिवासीचा जीवनाधार हिरावून घेऊन आदिवासींना काडीचाही उपयोग नसलेल्या चीड–वृक्षाच्या लागवडीतून आपण निर्यात-दर्जाचा उच्च प्रतीचा कागद निर्माण करणार होतो. अनेकांची माया त्यात गुंतली होती. आम्हाला योजनेच्या सामाजिक परिणामांची माहिती घ्यायची होती.

आम्ही माहिती घेत भटकत इंद्रावतीच्या काठच्या अशाच एका गावी आलो. गावकऱ्यांनी नुकतीच वडया देवाच्या पूजेसाठी 'पारध' केली होती. मेलेल्या चितळाला बांबूला उलटा टांगून गावकरी आपल्या गावाकडे परतत होते वनखात्याच्या गार्ड जनाबसाहेबासमोरून.ज नाबसाहेबांचा मुद्दाम अपमान करण्याचा त्यांचा हेतू नव्हता वा चितळाची पारध केल्याबद्दल मनात चोरीची भावनाही नव्हती. पारध त्यांचा सहज–हक्क होता.

पण हा हक्क, ही भावना फॉरेस्टच्या जनाबसाहेबाला बाहेरच्या सुसंस्कृत जगाला कुठेतरी बोचते आहे, सलते आहे.

जगदादपूरचे एक बडे वनअधिकारी पारधच्या घटनेवर भाष्य करत होते. जंगली आदिवासींच्या जंगली रीती–रिवाजांबद्दल, जंगलनाशाबद्दल उद्वेगाने बोलत होते. अडाणी–आडमुठ्या आदिवासींना धडा शिकविण्याची शपथ खात होते. साहेबांचा आलिशान बंगला, बंगल्याचे फर्निचर धारातीर्थी पडलेल्या किमती वृक्षाच्या लाकडांनी सजले होते. बंगल्याच्या भिंतीवर दिमाखाने मांडलेली वाघ–गवे–चितळ–सांबराची मुडकी साहेबांकडे, आमच्याकडे दर्याद्र नजरेने बघत होती.

सालचे 'किरकोळ' जगल साफ होणार होते. अगम्य भाषेतील, अगम्य कायदेकानून-खाली आदिवासीवर खटले दाखल होत होते.

पारध सुरू झाली होती. एका सुसस्कृत बलवान व्यवस्थेकडून दुसऱ्या एका जंगली कमजोर व्यवस्थेची !

¤

बस्तरहून परतलो आणि सुरू झाली पारध आमचीच मी–शेखर–किशोर–दिलीप –लालना–मुकुद अशा कामात जगत असलेले अनेक दोस्त अनेक वन–अधिकारी देखील. घटना, लोकाचे रीति–रिवाज–समजुती, घटनेची सामाजिक–राजकीय पार्श्वभूमी जाणून घ्यायची होती, समजून घ्यायची होती. भटकती सुरू झाली. केवळ बस्तरचीच नाही, तर दोन वर्षांत हात–पाय–सायकल–जीप–जे काही हाती–पायी लागेल त्याने आम्ही बस्तर--बिहार—केरळ—कर्नाटक-- भटकत होतो. माहिती जमवत होतो.

पण प्रत्यक्ष पारध बघायची राहिली होती

प्रत्यक्ष पारध बघायची बाकी होती.

परवा चंद्रपूरच्या जगलात त्याचसाठी मुक्काम ठोकून होतो.

¤

भेटल्यावर शेखरने पहिला प्रश्न विचारला नेहमीसारखा परतीचे रिझर्व्हेशन करून आलास–?

गेलो आठ वर्षे आदिवासीमध्ये राहून–भटकूनही मी कोरडा ठणठणीत राहिलो होतो माझा सूर्य घड्याळाच्या काट्यावर बसून उगवत होता. ऋतुचक्र कॅलेंडरच्या पानागणिक बदलत होते

मी 'नाही' म्हटल्यावर शेखर सुखावला आम्हाला पारध बघायची होती. लोकानाही पारध करायची होती. अखेर 'आज' तीन दिवसानी उजाडला. सकाळी म्हणता एका भर दुपारी आम्ही पारधीसाठी हिदुरच्या जगलात निघालो. हिदुर भमरागडच्या पलीकडे जगलात आहे· गावाला लागूनच भरदार झाडानी भारलेले टेकाड आहे टेकाडापलीकडे सुरू होतो अबूझ–माड–अनोख्या अनवड टेकाडाचा प्रदेश आम्हाला टेकाडापलीकडेच जायचे होते.

हिदुर– आलेवाड्याचे गावकरी आपापली हत्यारे घेऊन सिद्ध होत होते. बस्तरमध्ये मुख्यत: तीर–कामठ्यानी शिकार करतात. या भागात तीर–कामठ्याबरोबर भाले–तंगिये–जाळीही वापरतात. लोक भाले –तगिये–जाळी घेऊन आले होते. गावची पोरं गलोली घेऊन सज्ज झाली होती. गावची पोरच नाही तर गावातल्या बाया–बापड्या, लेकुरवाळ्या, पोटुशी बायका पण शिकारीला निघाल्या होत्या. शिकार गवसली तर कडेवरच्या पोराला, पोटातल्या बाळाला इतराच्या बरोबरीने शिकारीचा वाटा मिळणार होता. तसा रिवाजच आहे. साधारणत तीस-पस्तीस जणाचा जथा होता. गावचे शिवार ओलाडीपर्यंत सर्वजण गलका करीत चालले होते; पण शिवार सपताच एका जथ्याचे दोन जथे झाले. जाळकरी जवळच्या वाटेने टेकाड-माथा जवळ करू लागले. आम्ही उजव कडे मागे जाऊन दूरच्या वाटेने माथ्याकडे निघालो. गावाकडच्या टेकाडाच्या पलाकडच्या माथ्यावर जाळकरी जाळी लावणार होते. खरा हाका पलीकडच्या घढीमध्ये सुरू होणार होता. आम्ही आता नसतेच असतील–नसतील ती जनावरं घढीच्या दिशेने हुसकत निघालो होतो.

सुरुवातीला नुसतीच गराडी-गिराडीची मामुली झाडो लागली. आमचा जथा कोणी काही न सागता पागला. एकमेकाना नजरेच्या टप्प्यात ठेवून पुढे पुढे सरकू लागला; पण हे मामुली जगल फार वेळ राहिले नाही. काही ठिकाणी काठालगतच नदीचे गहिरेपण सुरू होते तसे या जगलाचे होते.किरकोळ झुडपे मागे पडली आणि साजाची–बीजाची धावड्याचा–धामणीची भरदार वृक्षराजी सुरू झाली आभाळाला जाऊन भिडणारी. अधून-मधून बाबूच्या राज्यात कंदमूळ शोधण्यासाठी रानडुकरानी जागोजाग केलेली उकराडी. एखाद्या एडविनाच्या प्रचंड झाडावरील मधाचे पोळे खाण्यासाठी अस्वलानी केलेल्या चढाईच्या खाणा-खुणा. बाकी पतझड सुरू झाल्यामुळे जनावराच्या पाऊलखुणा सापडणे कठीण होते. शिवाय वाळक्या पानावरून जाताना आपल्याच आवाजाचा वेध घ्यायला होत होते. तरीही गावकरी सराईत नजरेने, सावध चित्ताने चालले होते. जनावराच्या निवाऱ्याच्या-वसतीच्या सर्व साधारण जागा त्याना माहीत होत्या. नाल्याकाठच्या थडगार जाळीत वाघोबा, दगडा–धोड्याच्या राशीत गुहेत अस्वलोबा, थोड्या विरळ कुरणावर रानगवे, आणखी मोकळ्या कुरणावर हरणे. जगलातल्या खारट जागी (Solt licks) हरण हमखास येतात खारट क्षार चाटण्यासाठी. मग येणारे–जाणारे वाटसरूही तिथे लघवी करतात हरणाना आकर्षित करण्यासाठी. आम्ही फैलावून कानोसा घेत चाललो होतो. या जगलात भरपूर जनावरे आहेत; पण त्याचे काही खरे नाही. गावकऱ्याना वाटत मुबईच्या गल्लोगल्ली अमिताभ–रेखा भेटत असतील, मग निराशा येते. तसच आपल्यालाही वाटते. रानात पावलागणिक वाघ-सिंह भेटतील; पण प्रत्यक्षात कधी–कधी रानोमाळ भटकून ससाची शेपटीदेखील दृष्टीस पडत नाही. आताही तसेच झाले होते आणि आम्ही जरा सुस्तावल्यावर आमच्या अगदी उजवीकडून रानडुकराची एक टोळी जगलात घुसली. आयती शिकार गमावल्याने सर्व जण हळहळले; पण सुरुवातीलाच जनावराची चाहूल लागल्याने थोडे खूषही झाले.

रानातल्या झऱ्याकाठच्या एका प्रचंड उवराखाली परत दोन्ही जथ्थे एकत्र जमले. जरा बिडी काडी झाली आणि परत सर्व फौज निघाली आता शेखरने मला जाळकऱ्याच्या जथ्याकडे सोपवला. कारण डोगरमाथ्यावरून हाक्याचा एकूण अदाज येणार होता, कदाचित 'पारधी'चा अंतिम अकहा अगदी जवळून अनुभवता येणार होता. (आणि मुख्यत: शेखरच्या मते भर उन्हानला खडतर हाका मला भावणारा नसावा !) माझ्या जोडीला बूढा जग्गा शिकारी आणि दोन माडिया तरुण होते जग्गा नामी शिकारी. पूर्वीचे आय जी. पी नानावटीसाहेबाचे वाघाच्या हल्ल्यातून प्राण वाचवल्याबद्दल बंदूक वगैरे मिळवलेला. खाली धडुतं, वर गजी, डोक्याला साहेबी फेल्ट हॅट आणि डोळ्याला चष्मा लावलेला जग्गा मोठा मजेशीर दिसत होता. आता त्याची नजर कमजोर झाली होती; पण कान तेज होते. जिगर कायम होती लौकरच त्याचा प्रत्यय आला.

आम्ही डोगरमाथ्यावर पोहोचेपर्यंत जाळकऱ्यानी पुरुषभर उचीची आणि तीस-चाळीस फूट लाबीची तीन-चार जाळी आजू-

बाजूच्या झाडोऱ्यात बेमालूमपणे बसवली देखील होती. जाळयाच्या आजूला-बाजूला मध्ये भाला घेऊन ते तैयारीत बसणार होते. जनावर जाळयात फसल्यावर भाल्याने वार करायचा. पहिला वार करेल त्याला खांद्या-जवळील रुचकर मासाचा मोठा हिस्सा. मग दुसऱ्या 'वारकऱ्या'ला बाकीच्यांना समान हिस्से. आम्ही अगदी उजवीकडील जाळीच्या बाहेरच्या अंगाला झुडपाआड लपून बसलो. मी कॅमेरा-डायरी वगैरे अगदी सरसावून ठेवली. सहज घडयाळात पाहिले, दुपारचे सव्वा-तीन वाजले होते!

आम्ही—जाळकरी—बायका—पोरं आपापल्या जागी बसलो आणि एकदम सर्व काही शात झाले. चिडीचिप झाले. जगलाने सर्वच माणसाना गिळले की काय असे वाटायला लागले. अशा दुपारच्या वेळी जंगल किती भयंकर शात असते याची कल्पना यायची नाही. जंगल शात असते. मख्ख असते. मठ्ठ असते. घळीच्या खालच्या अगाकडून एक पक्षी चीत्कारला आणि मग परत सन्नाटा पसरला. एवढयात जाळयाकडून मोठयांदा आवाज आला. कोऽकूऽकोऽकूऽकोऽकू चितळासारखा. एकदा-दोनदा-तीनदा. खालच्या-वरच्या दोन्ही जथ्यांना एकमेकाचे इशारे मिळाले असावे. कारण 'चितळा'च्या आवाजानिशी खालचे रान हाऽहाऽहोऽहो च्या आरोळयानी पेटून उठले. आरोळया राना-वनात घुमू लागल्या. रान ढवळून काढू लागल्या हाकेकरी घळीच्या चढ-उतारावर 'यू' आकाराचा फासा करून वर जाळयाच्या दिशेने सरकू लागले.

हाकेकऱ्याचे पाच-सहा गट झाले असावेत. हाका थाबून थांबून आजूबाजूला सरकत; पण एक समान अतर ठेवून फास आवळत असावेत. अर्थात धड दिसत काही नव्हते; पण एखादा गट फार पुढे वा मागे राहिल्याचे जाणवत नव्हते. आम्ही जनावराची चाहूल घेत होतो. काही वेळ तसाच गेला. एवढयात कानोसा घेत जग्गा बूढा म्हणाला, काही तरी जनावर उठलं आहे. मी कॅमेरा सरसावत एकदम धडपडत उभा राह्यला लागलो. तो जग्गाने मला नजरेने दाबला. 'जरा सबूरीने घे!' बरोबरचा माडिया तरुण अलगद उठला आणि म्हणाला, 'बहुधा 'पट्टी' (रानडुक्कर) आहे.' आम्हीही अलगद उभे राहिलो. डोळे ताण-ताणून बघू लागलो. इतक्यात आम्ही आणि हाकेकऱ्यांच्या मधल्या भागातून अस्वल उठले. एक की दोन? बहुधा दोन असावीत. पट्टी नाही तर 'एज्जू' (अस्वल) म्हटल्यावर पोरे हादरली. मी तर साफ हादरलो. हे यडे जनावर केव्हा काय करेल याचा भरवसा नाही. एकटया माणसाला भिऊन पळेल नाही तर पन्नास माणसांवरही खाली मुडी घालून धोंधावत येईल. त्यातून बस्तर-अब्जमाडसा आमच्या भटकतीमध्ये अस्वलाने सबध थोबाड विचित्र-विद्रूप केलेली माणसं पाहिली होती. त्यामुळे केरळच्या सायलेंट व्हॅलीमध्ये रानटी हत्तीची जेवढी भीती वाटली नव्हती तेवढी भीती अस्वलाबद्दल मनात कायम दबा धरून असे. सुदैवाने आता अस्वल आमच्या विरुद्ध दिशेने पळाली. जगलात एकदाची अस्वल दिसली म्हणून मी थोडा मनातून खुषही झालो होतो. साले हे मनाचे मोठे विचित्र असत. संकट काय की मृत्यू काय भीती वाटते आणि ओढही वाटते. मी खूष झालो; पण बरोबरच्या पोराना खुषी बनवायला


With Best Compliments From

## Amar Art Products

Balaji Ward No. 1, Chandrapur

Manufacturing : Forest Tools, Trophies, Medals & Presentation Articles.

सवड नव्हती. ते जवळचे दगड-धोंडे भराभर अस्वलाच्या दिशेने भिरकावत होते. अस्वले आपल्या दिशेने पलटून येऊ नयेत म्हणून ओरडत होते. मग मीही ओरडायला लागलो.

पण अस्वले गेली त्या बाजूने एकदम ओरडा झाला. हाऽहाऽहोऽहो. ओरड्या-निशी अस्वल त्या बाजूने पलटली आणि आम्हाला समांतर विरुद्ध दिशेने धावू लागली; पण ही ज्या दिशेला जात तिथले हाकाकरी त्याना पिटाळत. कोणालाच एज्जूशी जवळीक नको होती. या गोंधळाने अस्वले बिथरली. एवढ्यात कोणी तरी बंदुकीचा बार टाकला. बार टाकला मात्र आणि बाराच्या दसपट 'घाँऽघाँऽघाँऽ' या अस्वलाच्या आरोळ्यानी रान हादरले. काळजाचा थरकाप करणारा आवाज. सूडाने पेट-लला आवाज. नुसता आवाजच नाही आता ती सरळ आमच्या दिशेने धावत येऊ लागली. आता अस्वले आपल्याच दिशेने आली म्हटल्यावर माझी पार फाटली! धावावे-पळावे-उठावे-बसावे-बोंबलावे काही सुचेना. जग्गा म्हणत होता, 'उगाच पळापळ करू नकोस. झाडामागे चुपचाप उभा रहा!' तो ढीग म्हणेल; पण आजूबाजूला बघतो तो कोणी नाही. बरोबरचे दोन्ही जवान साथीदार झाडावर! माझा धीर सुटला. मी जवळच्या एका वाळक्या झाडाला लोबकाळलो मूर्खासारखे. अगोदर एखादे झाड हेरून ठेवले नव्हते! झाड कवटाळले; पण पकड मिळेना. पायात 'हंटर' शूज! अस्वले क्षणाक्षणाला जवळ येताहेत. शेवटी जिवाची पकड मोठी. हात-मनगटाच्या ताकदीवर फादी गाठली. थरथरत. (हा माझा 'रिपीट परफॉर्मन्स्'. मागे भमरागडच्याच जगलात आग्या मधमाशानी उभा फोडला होता. माशा मागे लागल्याने वाट चुकून रानात सैरावैरा पळत होतो एवढ्यात वाघाच्या डरकाळ्याच्या आवाजाला घाबरून अशीच फादी गाठली होती. बघतो तो दोन बैल समोर झुज घेत होते. ते असो. त्यामुळे निदान गाव तरी दिसले होते!)

आता फादी गाठली; पण अस्वले कुठे तरी गुडुप झाली. आपल्यावर हल्ला करण्यासाठी दबा तर धरून बसली नसतील? चार-मिनार पेटवली. तेवढीच अस्वलाना धुराची भीती!! धुराच्या भीतीने, की कशाने देव जाणे अस्वले बहुधा जाळ्याकडे गेली असावीत. कारण त्या बाजूने धडपड-ण्याचा आवाज आला. अस्पष्ट आवाज आणि आवाजाच्या दिशेने सावलीसारखा सरकणारा कोणी तरी माणूस. या गध-ड्याला अस्वल तिथे गेले हे माहीत नाही का –

काही क्षणच. कोणी तरी जीवघेणी किंकाळी फाडली आणि मग किंकाळ्या आणि अस्वलाचे गुरकावणे एवढेच ऐकू येऊ लागले अस्वलाने कोणाला तरी झपाटले होते. लेकुरवाळ्या बायका त्याच बाजूला होत्या. कोण होते, काय घडत होते काही समजेना. कारण मी जवळ असलो तरी मध्ये झाडी होती काही का असेना माझ्या जवळूनच कोणी तरी जिवाच्या आकाताने ओरडत होते आणि मी जिवाच्या भीतीने झाडाला घट्ट मिठी मारून असहाय-पणे ऐकत होतो. नि:शस्त्र होतो म्हणून काही करू शकत नव्हतो आणि सशस्त्र असतो तरी काही करू शकलो नसतो. कारण त्या क्षणाला आपल्या जिवाच्या


With Best Compliments From

**Ion Exchange (India) Limited.**

P. O Box No. 6273, Tiecicon House
Dr. E. Moses Road, Bombay 400 011

Phone : 379522 / 892305 / 894373 / 395054

पलीकडे काही करण्याची इच्छाच मेली होती !

मला अपघात नवीन नव्हते. मीही काही अपघातांतून गेलो आहे. भयानक दृश्यंही नवीन नव्हती. बांगलादेशमध्ये नदीतून वाहणारी प्रेतं किंवा बेफाम कुत्रे फाडत असलेले मुडदे पाहिले होते; पण हा असहाय्यपणा भयानक होता. माझ्याबरोबरची तगियाकुन्हाडवाडी पोरपण झाडाला बिलगून होती. अखेर जगलात ज्याचा तो ! जंगल काय, जीवन काय अशा निर्वाणीच्या क्षणी ज्याचा तो, हे माहीत होतं. तरीही अशा कसोटीच्या क्षणी आपण कमकुवत आहोत, भेकड आहोत, जीवनाच्या रणांगणात पाऊलभर पाण्यातही नाही आहोत ही जाणीवच स्वतःचा चेंदा-मेंदा करून टाकणारी होती. स्वत.लाच आरपार जाळून टाकणारी होती. त्या क्षणीही होती (पुढे ही जाणीवही जाईल, शहाणा होईन, सुरती होईन !) मधमाशा मागे लागल्या तेव्हाही असच झाल होतं. माझी झाकली मूठ राहिली होती; पण आत्मा-परमात्म्याच्या ब्रह्मगोष्टी करणारे आम्ही सर्वजण आपापले जीव घेऊन पळालो होतो आणि प्रकाश आमटेच्या पिलूला उरीपोटी धरून पहाडातून सुखरूप खाली आणले होते. आत्मा धड उच्चारताही येत नसलेल्या यडच्या कल्याणने खरोखरच तो यडा होता -

या क्षणीही स्वतःच स्वतची भयंकर लाज वाटत होती. काही करू शकत नव्हतो म्हणून नाही तर काही करण्याची इच्छाच मेली होती म्हणून.

गदारोळ काही वेळ चालू होता. काही क्षण, काही तास, काही युग काही समजलं नाही, उमजलं नाही. हाकेकरी आरडाओरडा करत जवळ येत होते. झाडावरून खाली उतरलो होतो; पण जखमी माणसाला शोधण्याचं, सामोरं जाण्याचं धैर्य होत नव्हत. अस्वलाच्या ओरबाडण्यानं विद्रूप केलेले चेहरे नजरेला भेडसावत होते. अखेर सामोरं जाणं भागच होतं. झुडपाआड एक मनुष्य रक्ताच्या थारोळ्यात पडला होता. अस्वलाने मगा महाळाच्या दोन्ही माड्या फोडल्या होत्या. कोणी तरी ओरडले इथे आणखी कोणी तरी पडले आहे. जवळ जाऊन बघतो तो पुसूच्या माडीचा अस्वलाने खोलवर चावा घेतला होता !

मी पार चक्रावून गेलो. काय करायला आलो न् काय झालं होतं. समोर मंगा–पुसु होते कदाचित मी–शेखरही असतो. कदाचित् अस्वलही असते तकदीरच्या जाळ्यामध्ये कोण कस फसेल काय सागावं ! मी सुन्नपणे पहातच होतो.

'जगदीश, वेधळ्यासारखा बघत काय उभा राहिला आहेस ? पटकन रुमाल काढ. जखमेच्या वरच्या अगाला आवळून बाध – आवाजाने मी भानावर आलो. शेखर आला होता. शेखर आला आणि within no time he was master of situation माणसं अशा वेळी समजतात.जाणवतात शेखरबरोबर आमचा रॉबिनहुड रघु मुदलियार होता. शेखरने फर्मावलं चार माणसं घेऊन पुढे हो. जीपची व्यवस्था कर. जखमींना तावडतोब प्रकाशकडे लोकबिरादरी दवाखान्यात पोहोचवायला हवं आम्ही तोपर्यंत त्यांना पहाडाखाली घेऊन येतो निघालो खरा, पण एकच अंतिम सत्य जाणवत होत. आता या बिकट रानातून रस्ता गाठण्याचं!

भमरागाडला दत्ता पाढरे भेटला. त्याने तावडतोब पेपरमिलची जीप मिळवून दिली. जीप घेऊन आम्ही जगलाच्या उंबरठ्यावर पोहचेपर्यंत शेखरने गावकऱ्याच्या मदतीने बाबूच्या डोल्या करून खाली आणलेदेखील होते. दोघाना जीपमध्ये घातले. मगा विवळत होता; पण पुसु सलामी घ्यावी तसा ऐटीत जीपमध्ये समोर बसला होता. कसं घडल, काय घडलं हे जाणून घ्यायची उत्सुकता होती; पण बहाद्दर पुसु मगाच्या मदतीला धावला एवढच समजलं होतं. मगाला विचारण्यात अर्थ नव्हता. त्याला भयकर रक्तस्राव होत होता. सुदैवानं दोघाच्याही डोळे–तोंड–छाती–पोटाला जिवावरच्या जखमा नव्हत्या !

रात्री मगाच्या जखमा बाधून झाल्यावर न रहावून मी विचारलं, 'मगा, अस्वल जाळ्याच्या बाजूला गेलं, दिसल नाही का तुला ? आणि समजा जाळ्यात फसल असल तरी बिथरलेल्या अस्वलाच्या मागं कशाला वेड्यासारखा गेलास–?'

मगा अर्धवट गुंगीत होता तरी क्षीण आवाजात म्हणाला, 'जाळ्यातलं अस्वल निसटून पळाल मागून आलेल्या दुसऱ्या अस्वलानं अचानक हल्ला चढवला–' आणि मग त्या गुंगीतही माझ्याकडे नजर रोखून म्हणाला, 'साहेब, जाळ्यात अस्वल आहे. हातात भाला आहे तरी तुम्हाला झाडावर बसून रहायच होतं– तर मग कशाला येता पारधीला–'

अस वाटल त्यापेक्षा अस्वलानं उभा फाडला असता तर परवडलं असतं.

अर्थात आता असं वाटतं !!

---


मांडणी, विचार व देखणेपणा या साऱ्यातच 'उत्तम' असे म्हणता येईल असे हे पुस्तक आहे.

**–प्र. बा. भोसले**

संपादक, बळीराजा मासिक

# योद्धा शेतकरी

**ले. विजय परुळकर**

**राजहंस प्रकाशन, पुणे ३०**

मूल्य : ३६ रुपये

१९८० च्या वनविधेयकावरील चर्चेच्या अनुषंगाने तज्ज्ञ अभ्यासकांचे वननीतीसंबंधी विपुल लिखाण प्रसिद्ध झाले. वनविधेयकाच्या टीकाकारांचा पवित्रा आता केवळ बचावात्मक स्वरूपाचा राहिलेला नाही. वनविधेयकाच्या मसुद्यामध्ये सुधारणा व्हाव्यात, एवढेच नव्हे तर सध्या अस्तित्वात असलेल्या वननीतीचा नव्याने फेरविचार व्हावा अशी त्यांची मागणी आहे. जुन्या आणि नव्या वननीतीचा वेध घेणारा हा माहितीपूर्ण लेख...



●

शरद कुलकर्णी

# नवीन सामाजिक वननीती : निकड व स्वरूप

वननीती ही एकूणच विकासनीतीचा एक भाग असल्याने लोकाभिमुख विकासनीतीच्या संदर्भात लोकाभिमुख वननीती मांडणे निकडीचे आहे. वनात राहणाऱ्या लाखो गरीब आदिवासींच्या दृष्टिकोनातून वनविधेयकाचा आढावा घेण्याचा प्रयत्न येथे करण्यात आला आहे. सध्याच्या वननीतीचा आढावा घेण्यापूर्वी वननीतीचा विकास ऐतिहासिक दृष्टिकोनातून तपासणे सयुक्तिक होईल.

ब्रिटिश काळापूर्वी वनजमीन व वनोत्पादने यावरील लोकांच्या हक्कांचे नियमन सामाजिक–सांस्कृतिक रीतिरिवाजांद्वारे होत असे. विपुल जंगलसंपत्ती व त्यामानाने कमी लोकसंख्या यामुळे जंगलविषयक समस्या जाणवल्या नाहीत. वड, पिंपळ यांसारखे वृक्ष तोडणे धार्मिकदृष्टया निषिद्ध मानले जात असे. काही पवित्र व संरक्षित जंगले 'देवराया' म्हणून ओळखली जात व त्यातून फक्त गळून पडलेली पाने, फुले, फळे घेता येत असत. देवरायांतील वृक्ष तोडण्यास मनाई असे. अशा प्रथांमुळे नैसर्गिक जंगले व त्यातील जीवजिवाणू यांचे आपोआपच संरक्षण होत असे.

### ब्रिटिशकालीन वनविषयक धोरण

जंगलाचे व्यापारी महत्त्व धूर्त ब्रिटिशांच्या ध्यानी आले व त्यांनी त्यापासून महसूल मिळविण्यास व जंगलावरील लोकांचे हक्क मर्यादित करण्यास सुरुवात केली. हे सर्व जंगलांचे संरक्षण करण्याच्या नावाखाली होत असे. जंगलांचे संरक्षण करण्यासाठी जंगलात राहणाऱ्यांचे त्यावरील हक्क सीमित करणाऱ्या सूचना अंतर्भूत असलेले एक फर्मान ऑगस्ट १८५५ मध्ये काढण्यात आले. १८९४ मध्ये त्यात आणखी सुधारणा करण्यात आल्या. त्यानंतरच्या वनविषयक कायद्यांद्वारे लोकांच्या जंगलविषयक हक्कांवर अधिकाधिक बंधने घालण्यात आली.

### शासकीय वनकायदा–१८६५

सरकारी जंगलांचे संरक्षण व नियमन करणाऱ्या तरतुदी व नियम अंतर्भूत असलेला कायदा सर्वप्रथम १ मे १८६५ रोजी अस्तित्वात आला. वृक्षावरणाखाली असलेली कोणतीही जमीन अगर झाडेझुडे अगर जंगले सरकारी जंगले म्हणून घोषित करण्याचे अधिकार सरकारला या कायद्याद्वारे देण्यात आले. मात्र यामुळे कोणाही व्यक्तीच्या अगर समूहाच्या त्यावरील हक्कांवर गदा येऊ नये असे नमूद करण्यात आले. वृक्षांचे संरक्षण करण्यासाठी नियम करण्याचे अधिकार सरकारला देण्यात आले. या कायद्यातील प्रतिबंधांचे उल्लंघन करणाऱ्यास शिक्षा करण्याची तरतूद करण्याचे अधिकार शासनाला देण्यात आले.

### भारतीय वनकायदा–१८७८

१८७८ चा वनकायदा १८६५ च्या कायद्यापेक्षा अधिक व्यापक होता. राखीव जंगले, संरक्षित जंगले व गावजंगले यातील प्रकारात जंगलांची विभागणी करण्यात आली. राखीव जंगलातील जमीन व उत्पादने यावरील आपले हक्क नोंदवून घेण्याची सूचना देण्यात

आली. लोकानी हक्क सांगितलेल्या जमिनीचा ताबा मिळविण्याचे अधिकार जगलअधिकाऱ्याना देण्यात आले: लोकाकडून सदरहू हक्क नोंदवून घेण्याची जबाबदारी फॉरेस्ट सेटलमेंट ऑफिसरवर टाकण्यात आली. हक्कदाराचे हक्क शाबूत राहतील अशा प्रकारे नियोजित राखीव जंगलाच्या सीमामध्ये योग्य ते फेरबदल करण्याच्या तरतुदीचा समावेश यात होता. इमारती लाकडावर कर बसविण्याच्या काही तरतुदी करण्यात आल्या. अशा प्रकारे जगलावर सरकारी नियंत्रण प्रस्थापित करण्याचे धोरण १८७८ च्या वनकायद्याद्वारे अधिक व्यापक करण्यात आले.

## राष्ट्रीय वननीती-१८९४

१८९४ मध्ये सरकारने आपले वनविषयक धोरण स्पष्ट केले ते असे –

१. जंगलांचे नियमन करण्यामागे जनतेच्या हिताचाच दृष्टिकोण आहे. जंगलांचे संरक्षण करण्यामध्येच त्यावरील लोकाच्या हक्काचे नियमन करणे अतर्भूत आहे.

२. पाण्याच्या प्रवाहामुळे जमिनीची होणारी धूप व त्याचे जंगलातील हवामान व भौतिक परिस्थिती यावर होणारे दुष्परिणाम टाळण्यासाठी डोंगरउतारावरील जंगले सरक्षित जंगले म्हणून राखण्यात येतील.

३. मूल्यवान इमारती लाकडांचा साठा असलेल्या जगलाचे व्यवस्थापन सरकारला महसुली उत्पन्न मिळवून देण्याच्या दृष्टीने व्यापारी तत्त्वावर केले जाईल.

४. लागवडीखाली येऊ शकणाऱ्या जमिनीची मागणी जगलजमिनीद्वारेच पूर्ण करता येण्यासारखी असेल त्या वेळी खालील अटींवर अजिबात खळखळ न करता तसे केले पाहिजे.

(अ) लागवडीखालील जमीनपट्ट्याचे निमित्त करून मूल्यवान जंगलाचा वापर मध गोळा करण्यासाठी करण्यास मज्जाव केला जाईल.

(ब) अशा प्रकारची लागवड कायम स्वरूपाची असावी. मात्र जंगलावर अवलबून असलेल्या वाजवी गरजा पूर्ण करण्यासाठी आवश्यक असलेल्या किमान जंगलक्षेत्रावर लागवडीसाठी अतिक्रमण करण्यास प्रतिबंध करावा.

५. कमी प्रतीचे इमारती लाकूड, सरपण व चारा आणि उपलब्ध असणाऱ्या जंगलाचे व्यवस्थापन प्रामुख्याने स्थानिक लोकाना हितकारक दृष्टिकोनातून करण्यात यावे.

अशा प्रकारे या वनविषयक धोरणात जगलाचे व्यापारी उपयोग व त्याचे पर्यावरणरक्षणाच्या दृष्टिकोनातून महत्त्व यावर भर देण्यात आला. जगलजमीन व उत्पादने यावरील जगलवासियाचे हक्क व अधिकार मर्यादित करण्याचा मार्ग यामुळे खुला झाला.

## भारतीय वनकायदा

स्थानिक सरकारांद्वारे करण्यात आलेल्या विविध कायद्यान्वये १८७८ च्या कायद्यात अनेक दुरुस्त्या करण्यात आल्या १८७८ च्या वनकायद्याच्या जागी 'भारतीय वनकायदा १९२७' नावाचा एक अतिशय व्यापक स्वरूपाचा कायदा अस्तित्वात आला. इमारती


With Best Compliments From

**The Sirpur Paper Mills Limited**

Sirpur – Kagaznagar 504296

Dist. : Adilabad ( AP )

लाकडावरील महसुलासकट पूर्वीच्या कायद्यातील सर्व प्रमुख तरतुदींचा समावेश १९२७ च्या कायद्यामध्येही करण्यात आला.

## भारत सरकार कायदा– १९३५

ब्रिटिश ससदेने १९३५ मध्ये संमत केलेल्या या कायद्यान्वये प्रातिक विधिमंडळे स्थापन करण्यात आली. जगलविषयाची समावेश प्रातिक यादीत करण्यात आला. त्यानंतर विविध प्रातांनी जगलाचे नियमन करणारे स्वत.चे कायदे केले. यापैकी बहुताश कायदे १९२७ च्या कायद्याच्या चौकटीवरच आधारित होते.

## स्वातंत्र्योत्तर वनविषयक धोरण

१९७६ पर्यंत भारतीय राज्यघटनेच्या ७ व्या परिशिष्टामध्ये राज्यसरकाराच्या यादीत जंगल हा विषय समाविष्ट होता. १९७६ मधील ४२ व्या घटनादुरुस्तीद्वारे तो राज्यसरकाराच्या यादीतून काढून सामाजिक यादीत समाविष्ट करण्यात आला. परिणामत: राज्याचे यासबधातील अधिकार सपुष्टात आले. केंद्र सरकारने २५ ऑक्टोबर १९८० रोजीच्या वनसरक्षण अध्यादेशाद्वारे राज्यांचे जगलावरील अधिकार सपुष्टात आणले. त्यानुसार केंद्र सरकारच्या पूर्व समतीशिवाय कोणत्याही हेतूसाठी कोणतीही जगलजमीन वापरू देण्याच्या राज्यशासनाच्या अधिकारास प्रतिबध करण्यात आला. या अध्यादेशाचे रूपांतर नंतर कायद्यात करण्यात आले.

## राष्ट्रीय वननीती– १९५२

१९५२ मध्ये भारत सरकारचा ठराव म्हणून नवी राष्ट्रीय वननीती जाहीर करण्यात आली. पुढील प्रमुख राष्ट्रीय गरजा पायाभूत मानून वनविषयक नवीन धोरण ठरविण्यात यावे असे जाहीर करण्यात आले.

१. निसर्गातील विविध प्रकारची सतुलने व जमिनीचा पूरक उपयोग यांची एक यंत्रणा उभारण्याची गरज– ज्यानुसार त्या त्या प्रकारच्या जमिनीतून अधिकाधिक उत्पादन निघू शकेल व जमिनीची कमी झीज होईल अशा प्रकारे त्या त्या जमिनीचा योग्य उपयोग करण्यात यावा.

२. खालील बाबी नियन्त्रित करण्याची गरज.

अ) डोगरभागातील जंगलतोड थाबली पाहिजे. नद्यांना होणारा पाण्याचा पुरवठा अशा जगलांवर अवलबून असतो. या नद्याच्या पात्रासभोवतालचा प्रदेश हा त्या देशातील सर्वांत सुपीक विभाग आहे.

ब) मोठमोठ्या नद्याच्या पात्रालगत वृक्ष नसल्यास नदीकिनाऱ्यालगतच्या जमिनीची प्रचड धूप होते ती थाबविणे आवश्यक आहे.

क) किनाऱ्यालगतच्या विभागावर वाढत जाणारी वाळू व वालुकाप्रसरणामुळे वालुकामय प्रदेशाची होणारी वाढ थाबविणे आवश्यक आहे.

३. नागरिकांच्या सामान्य आरोग्यास पोषक व उत्साहवर्धक वातावरणनिर्मितीसाठी जेथे शक्य असेल तेथे तेथे छोटी वृक्षवने निर्माण करण्याची निकड आहे.

४ मुबलक चारा, तसेच शेतीच्या अवजारासाठी लाकूड आणि विशेषत: सरपण उपलब्ध करून देण्याची निकड ज्यामुळे शेताचा उपयोग अधिकाधिक धान्यउत्पादनाकडे करता येईल.

५. इमारती लाकूड, तसेच लष्कर, उद्योगधंदे व दळणवळणाची साधने यासाठी लागणारी अन्य वनउत्पादने याचा नियमित पुरवठा होण्याची गरज.

६. वरील गरजा पूर्ण होण्याव्यतिरिक्त अधिकाधिक वार्षिक महसुली उत्पन्न मिळविण्याची गरज

१९५२ च्या वनधोरणामध्ये पर्यावरण संतुलनाच्या दृष्टीने जगलाचे सामाजिक महत्त्व यावर भर दिलेला आढळतो. व्यापार, उद्योगधंदे याच्या गरजा व महसुली उत्पन्न याना दुय्यम महत्त्व दिलेले आढळते. एका अर्थाने १९५२ ची राष्ट्रीय वननीती ब्रिटिशकालीन वननीतीचीच पुढची पायरी म्हणता येईल. जगलात व आसपास राहणाऱ्या आदिवासी व ग्रामीण जनतेचे जगलावरील हक्क व्यापक राष्ट्रीय हितसबंधाच्या आड येऊ नयेत असे नमूद करण्यात आले.

वास्तविक पाहता राष्ट्रीय हितसबध या सकल्पनेचा अत्यंत सकुचित अर्थ लावण्यात आला. मोठमोठी धरणे व जलविद्युत्प्रकल्प उभारणे, रस्तेबाधणी, दारुगोळ्याचे कारखाने इ. साठी करण्यात आलेल्या जगलतोडीचे निर्लज्ज समर्थन राष्ट्रीय हितसबधाच्या नावाखाली करण्यात आले. याउलट जगल–जमिनी म्हणून दाखविलेल्या परतु प्रत्यक्षात वृक्षावरणाखाली नसलेल्या जमिनी लागवडीखाली आणण्यास अतिक्रमण म्हणून संबोधण्यात आले शक्य असेल तेथे तेथे आदिवासींना वनाचा उपयोग करण्यास प्रतिबंध केला गेला. जगलापासून अधिकाधिक महसुली उत्पन्न मिळविण्याचे प्रयत्न सरकारने केले

## राष्ट्रीय शेतकी आयोग

बहुसख्य गरीब आदिवासींची उपजीविका जंगलावर अवलबून आहे, या वस्तुस्थितीकडे दुर्लक्ष करून कोणत्याही परिस्थितीत (जगलाबरोबरच) शेतीचेही व्यापारीकरण झाले पाहिजे, अशी शिफारस राष्ट्रीय शेतकी आयोगाने केली आहे. आयोगाच्या अहवालातील एक सपूर्ण प्रकरण वनासबधी आहे. वननीतीसंबधी या आयोगाने केलेल्या विधानाचा परामर्ष घेणे सयुक्तिक होईल. आरंभीच आयोगाने एक उदात्त घोषणा केली आहे

दारिद्र्याचे निराकारण व स्वावलंबन हे भारताच्या नियोजित विकासामार्गाचे पायाभूत उद्देश आहेत. मोठ्या प्रमाणावर खप असलेल्या मालाच्या उत्पादनामध्ये नोकरीची अधिकाधिक सधी उपलब्ध करून देणे हे दोन्ही उद्देश साध्य करण्याचा एक उत्तम मार्ग आहे त्याचबरोबर 'औद्योगिक उपयोगाच्या लाकडाचे उत्पादन ही जगलमालाच्या अस्तित्वासाठी अत्यत आवश्यक बाब आहे' असेही विधान करण्यात आले आहे आयोगाच्या विद्वान सदस्याच्या हे ध्यानात आले नसावे की, औद्योगिक उपयोगाच्या लाकडाची गरज निर्माण होऊनही शेकडो वर्षांपासून जगले अस्तित्वात आहेत. गरिबाच्या विरोधी असा या आयोगाचा व्यापारी दृष्टिकोण अहवालात ठिकठिकाणी दृष्टोत्पत्तीस येतो.

'ग्रामीण जनतेला वनोत्पादनाचा मोफत पुरवठा आणि त्याचे जंगलावरील हक्क व सवलती यामुळे जगलाचा नाश होत आहे

आणि त्यामुळे ही प्रक्रिया उलट दिशेने सुरू करण्याची निकड आहे. वनरक्षण व वनसवर्धन यामध्ये ग्रामीण जनतेचा फारसा वाटा नाही. जगलमालाचा अवाजवी वापर केल्यानतर आता त्यानी आपल्याला वनउत्पादने मोफत वापरण्यास मिळतील असे प्रयत्न कोणी तरी करेल अशी अपेक्षा बिलकुल बाळगू नये.' (पान २५)

आयोगाच्या शिफारशीनुसार सुधारित राष्ट्रीय वननीती देशाच्या पुढील महत्त्वाच्या गरजावर आधारित असावी.

१ देशाच्या आर्थिक प्रगतीसाठी तसेच लोककल्याणासाठी अधिकाधिक मालाचे उत्पादन होईल अशा प्रकारे जंगलमालाचे नियत्रण करण्यात यावे.

२ पाण्याचे प्रवाह, जमिनीची सुपीकता व धरणे व पाण्याच्या साठ्याचे उपयुक्त आयुष्य यावर प्रतिकूल परिणाम करणारी डोगरभागातील जंगलतोड व जमिनीची धूप रोखणे आवश्यक आहे.

३. नद्यांच्या वृक्षहीन किनाऱ्यालगतच्या जमिनीची धूप तसेच पडीक जमिनीची धूप थांबविणे व समुद्रकिनाऱ्यालगत आणि इतर भागात होणारा वालुकामय प्रदेशाचा विस्तार रोखणे.

४. लष्कर, दळणवळणाची साधने व इतर अनेक गरजा पुरविण्यासाठी आवश्यक औद्योगिक कच्चा माल इमारतीलाकूड व इतर वनउत्पादने याची वाढती मागणी पूर्ण करण्यासाठी अधिकाधिक वनउत्पादकतेची आवश्यकता आहे.

५. जंगलाचा नाश होणार नाही याची खबरदारी घेऊन जंगलभागातील जनावराना चारा पुरविणे.

६ ग्रामीण जनतेच्या सरपण व कमी प्रतीच्या लाकडाच्या गरजा पुरविणे.

७. मधूनमधून लागवडीखाली आणलेली जमीन असलेले जगलपट्टे निर्माण करणे, माती, झाडेझुडपे व प्राणिजीवन यामधील निरोगी सबंध कायम राखले जातील अशा प्रकारे पर्यावरणरचनेमध्ये अधिकाधिक झाडाची लागवड करणे व एकप्रजातीय लागवडीस हानिकारक अशा कीटकाच्या शत्रूच्या विनशाची शक्यता कमी करण्यासाठी वैविध्यपूर्ण जैविक संग्रह प्रस्थापित करणे.

उपयुक्ततेच्या दृष्टीने संरक्षक जगले, उत्पादक जंगले सामाजिक जंगले या तीन प्रकारांत जंगलाची विभागणी करावी अशी आयोगाची शिफारस आहे

सरक्षक जंगलामध्ये डोंगरउतार, नद्याची पाणलोटक्षेत्रे, नदीकिनारा, समुद्रकिनारा यासारख्या धूप व झीज होईल अशा भागावरील जंगलाचा समावेश असावा.

उत्पादक जंगले ही प्रामुख्याने व्यापारी जंगले असावीत व त्यामध्ये मूल्यवान इमारती लाकूड देणारे वृक्ष असणाऱ्या जंगलाचा समावेश असावा. देशाच्या आर्थिक विकासाच्या दृष्टीने, तसेच राष्ट्रीय अर्थव्यवस्थेच्या विविध गरजा पूर्ण करण्यासाठी उत्पादक जंगले अत्यावश्यक आहेत.

सामाजिक जगलामध्ये पडीक जमिनी, ग्रामपचायतीच्या मालकीच्या जमिनी, गावठाण, तसेच रस्ते, कालव्यालगतच्या जमिनी तसेच रेल्वेमार्गालगतच्या जमिनी यावरील वृक्षावरण याचा समावेश असावा. रस्ते, कालवे व रेल्वेमार्गालगतच्या जमिनीवर चारा, फळे व सरपण देणाऱ्या वृक्षाची मिश्र लागवड करावी.

आयोगाने उत्पादक जगलाना सर्वोच्च अग्रक्रम व सामाजिक जंग

With Best Compliments From

**M/s. Orient Paper Mills Ltd.,**

P. O. Ambai Paper Mills 484117

Dist. : Shahdol ( MP )

लाना नीचतम अग्रक्रम दिलेला आहे हे यावरून स्पष्ट होईल. ग्रामीण जनतेच्या गरजाची दखल आयोगाने काही प्रमाणात घेतली असली तरी आदिवासींच्या गौणउपजविषयक गरजाकडे मात्र आयोगाने पूर्णत: दुर्लक्ष केलेले आहे. आयोगाच्या मते लोकसमूहाच्या पुढील गरजा पुरविणे हे जगलाच्या सामाजिक उपयुक्ततेत अतर्भूत आहे.

अ) शेतीअवजारासाठी लाकूड व सरपण

ब) चारा व गवत.

क) करमणूक.

घरासाठी लाकूड, छपरे शाकारण्यासाठी पाने, अन्न म्हणून वापरण्यात येणारी फळे, फुले व कंदमुळे, तेल गाळण्यासाठी जगलातून गोळा करण्यात येणाऱ्या बिया इ. आदिवासींच्या गरजा आयोगाने विचारात घेतलेल्या नाहीत हे आश्चर्यकारक आहे. करमणूक ही सामाजिक गरज असल्याचा उल्लेख आयोगाने केला आहे; परतु जंगलावर अवलंबून असणारी उपजीविका ही जगलवासियांची त्याहीपेक्षा महत्त्वाची गरज असल्याची जाणीव आयोगाला आहेसे दिसत नाही. यापैकी काही बाबींच्या उल्लेख सहज जाता जाता केलेला आढळतो. मात्र देशाच्या महत्त्वाच्या गरजामध्ये त्याचा समावेश केलेला नाही. प्रामुख्याने पडीक जमिनीवर सामाजिक वने उभारावयाची आहेत. आयोगाचा भर प्रामुख्याने मानवनिर्मित उत्पादकवने उभारण्यावर आहे. वननीतीच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी सध्याचे कायदे अधिक जोरकस करण्याची शिफारस आयोगाने केली आहे. (पान २९). भारतीय वनकायद्याचा मसुदा प्रामुख्याने राष्ट्रीय शेतकीआयोगाच्या शिफारशीवर आधारित आहे.

## भारतीय वनविधेयक–१९८०

भारतीय वनविधेयकाच्या मसुद्यातील तरतुदीवरून नागर समाजाभिमुख व ग्रामीण समाजविरोधी पक्षपात स्पष्टपणे दिसून येतो. ही बाब तसेच विधेयकातील अनेक उणीवा अनेक अभ्यासकानी व कार्यकर्त्यांनी निदर्शनास आणलेल्या आहेत.

## प्रमुख तरतुदी

विधेयकातील काही व्याख्याचे स्वरूप अतिशय व्यापक आहे. उदाझाडेझुडपे असलेली चराऊ कुरणे, तसेच सरकारने 'जंगल' म्हणून जाहीर केलेली कोणतीही जमीन 'जगल' म्हणून समजली जाईल इतकी जगलाची व्याख्या व्यापक करण्यात आली आहे. (कलम २(३)) यावरून स्पष्ट दिसते की, झाडझुडपेसुद्धा नसलेली कोणतीही जमीन 'जगलजमीन' म्हणून सरकारला जाहीर करता येईल. त्याचप्रमाणे झाडे, पाने, फुले, फळे तसेच तसा उल्लेख न केलेले झाडाचे भाग किंवा अन्नउत्पादने तसेच सर्व प्रकारचे गवत, वेली, शेवाळ इ. सर्वांचा समावेश वनोत्पादनामध्ये करण्यात आला आहे. (कलम २(६))

विधेयकात आरक्षित जगले, संरक्षित जंगले, गावजगले यातील प्रकारात जगलाची विभागणी करण्यात आली आहे ही विभागणी प्रामुख्याने वनोत्पदनावरील लोकाच्या हक्कावर आधारित आहे. आरक्षित किंवा संरक्षित जगलात पाने, फुले तोडणे यासारखी प्रतिबध करण्यात आलेली कृत्यं केल्यास शिक्षेची तरतूद आहे. यासाठी वापरण्यात आलेली हत्यारे, अवजारेही जप्त करण्याचे अधिकार जगल–अधिकाऱ्याना देण्यात आले आहेत. जगलासबधीच्या गुन्ह्याबद्दल लोकाना अटक करण्याचे व मालमत्ता जप्त करण्याचे व्यापक अधिकार जगल–अधिकाऱ्याना देण्यात आले आहेत. विधेयकामध्ये लोकासाठी कठोर शिक्षेची तरतूद केली आहे, तर जंगलअधिकाऱ्याना मात्र व्यापक अधिकार व सवलती देण्यात आल्या आहेत. जंगलजमीन व वनोत्पादने यावरील व्यक्तिगत हक्क विधेयकात मान्य करण्यात आले आहेत; परंतु आदिवासी जमातीचे वनोत्पदनावरील अनेक हक्क सामूहिक स्वरूपाचे असतात, या वस्तुस्थितीकडे मात्र पूर्णपणे डोळेझाक केलेली आहे. अशा प्रकारे या विधेयकामध्ये जंगलाचे सरक्षण लोकासाठी न करता लोकापासून करण्यावर भर देण्यात आला आहे. लक्षावधी गरिबांच्या उपजीविकेचे साधन म्हणून असलेले जंगलाचे खरे महत्त्व या विधेयकाने नाकारले आहे या विधेयकातील तरतुदी १९४७ च्या भारतीय वनकायद्यात समाविष्ट असलल्याच आहेत, असा करण्यात आलेला दावा चुकीचा आहे तरतुदीमध्ये काही बदल करण्यात आले आहेत. वस्तुत: १९४७ चा वनकायदा आणि १९८२ चा वनकायदा हे पूर्णत. भिन्न असले पाहिजेत. त्यानुसार वनविषयक धोरण तसेच वनविधेयकामध्ये मूलभूत बदल होण्याची निकड आहे गरिबीचे उच्चाटन करण्याचे ककण हाती बाधलेल्या सरकारला कोणताही कायदा अगर नीती याचे समर्थन ती परकीय राजवटीत तशी होती या आधारावर करताच येणार नाही भूतकाळातील धोरणाचा पूर्ण फेरविचार व गरिबीचे उच्चाटन करू शकणाऱ्या धोरणाचा स्वीकार ही काळाची गरज आहे.

## नवीन वननीतीसाठी मार्गदर्शक तत्त्वे

नवीन वननीतीची उद्दिष्टे पुढीलप्रमाणे असली पाहिजेत. अ) पर्यावरण सतुलन. ब) फळ, फुले, कदमुळ, चारा, सरपण, खते या जगलवासियांच्या मूलभूत गरजा भागविणे. क) उद्योगाच्या कच्च्या मालाच्या गरजा व नागर समाजाच्या योग्य गरजा भागविणे. यामध्ये निर्यातीसाठी जगलउत्पादनांच्या गरजाना फारसे महत्त्व देण्यात येऊ नये.

## पर्यावरण–संतुलन

वनरक्षण व वनसवर्धन एकूणच मानवजातीच्या अस्तित्वाच्या दृष्टीनेच अत्यत निकडीचे आहे ही बाब आता सर्वमान्य झाली आहे. पर्यावरणसतुलनासाठी आणि जंगलाचे महत्त्व अनेक विद्वान अभ्यासकानी आपल्या लिखाणांमधून स्पष्ट केले आहे उत्तराखडातील स्त्रीपुरुषाच्या ओठावर असलेल्या एका अतिशय लोकप्रिय लोकगीतातून या अभ्यासपूर्ण लिखाणाचे सार व्यक्त केलेले आढळते चिपको आदोलनाचे ते एक घोषगीत झाले आहे–

क्या है जंगल के उपकार
मिट्टी, पानी और बयार,
मिट्टी, पानी और बयार,
जिंदा रहने के आधार

(जमीन, पाणी व प्राणवायू यातील गोष्टी म्हणजे जंगलाचे उप-

दान होय. जमीन, पाणी व प्राणवायू हे मानवी जीवनाचे आधार आहेत.

पर्यावरणसंतुलनाच्या दृष्टीने जगलाचे काही भाग त्याच्या नैसर्गिक अवस्थेमध्ये राखणे आवश्यक आहे. तथाकथित शास्त्रशुद्ध वननीतीच्या नावाखाली सरकारला अथवा मूलभूत गरजाच्या नावाखाली लोकाना या जंगलभागातील वृक्षाची तोड करू देऊ नये. परंपरागत देवरायांप्रमाणे हे जंगलभाग पवित्र मानले जावेत. केवळ गळून पडलेली पाने, फळे, फुले इ. चा उपयोग करू द्यावा. पर्यावरण संतुलनासाठी जंगलाचे विशिष्ट प्रमाण असणे आवश्यक आहे.

## जंगलांचे सामाजिक महत्त्व

जंगलांमुळे सुमारे ३० लाख गरिबाच्या काही मूलभूत गरजा भागतात. यापैकी बहुसंख्य ज्याचे कल्याण हा शासनाच्या धोरणाचा एक महत्त्वाचा भाग आहे असे जगलवासी आदिवासी आहेत. विकट परिस्थितीत जंगलवासी पाने, फळे, कंदमुळे यावर जगतात. आपल्या गुरासाठी चारापाणी ते जंगलातूनच मिळवतात. यापैकी बहुसख्य लोक जमीन लागवडीखाली आणण्यापूर्वी त्यावर वाळलेली पाने पसरून राब भाजतात. कित्येक आदिवासी स्त्रिया सरपण विकून आपला निर्वाह चालवितात. गौण वनोत्पादने गोळा करणे व विकणे यामधून बऱ्याच आदिवासीना रोजगार मिळू शकतो. जगल हे आदिवासीच्या उदरनिर्वाहाचे महत्त्वाचे साधन आहे याकडे सरकार नेहमीच दुर्लक्ष करते. एका विद्वान शासकीय अधिकाऱ्यांनी हे स्पष्टपणे माडले आहे. ‘आदिवासीचे अर्थकारण जंगले व त्यांचे अर्थकारण यांचेशी पूर्णत: निगडित आहे. हा अन्योन्य सबंध मान्य करण्यात आला असला तरी धोरणे व कार्यक्रम यामध्ये मात्र त्याचे प्रतिबिंब पडलेले आढळत नाही. त्यामुळे आदिवासीचे अर्थकारण व जगलाचे अर्थकारण हे एकमेकापासून दूर चालला आहे आणि याचा दोहोवरही प्रतिकूल परिणाम होत [आहे. काही बाबतीत जगलाचा नाश होण्यात त्याचे पर्यवसान होते तर काही बाबतीत राष्ट्रीय अर्थकारणावरही त्याचा प्रतिकूल परिणाण होत आहे. सामाजिक आर्थिक सरचनेतील असमतोल त्यामुळे वाढत आहे ’

अन्न, वस्त्र व निवारा या मानवाच्या मूलभूत गरजा मानल्या जातात सरपणाच्या अभावी नुसते कच्चे अन्न मानवाची भूक भागवू शकणार नाही. त्यामुळे लाकूड हीसुद्धा मूलभूत गरजच मानली गेली पाहिजे. ग्रामीण व आदिवासी जनतेच्या गरजा भागविण्यासाठी जगलाच्या सामाजिक उपयुक्ततेवर भर देण्यात आला तर वनरक्षण व वनसवर्धन यास ते पोषकच होईल. सार्वत्रिक ग्रामीण दारिद्र्य व पर्यावरणातील असमतोल या दोन्ही समस्या त्यामुळे सुटू शकताल आजच्या परिस्थितीत जगलाचे सरक्षण करण्यात ग्रामीण जनतेला फारसा रस नाही. केवळ वनरक्षक व पोलीस याच्या द्वारे जगलाचे संरक्षण होणे अशक्य आहे. जगलाद्वारे ग्रामीण जनतेचे हितसबंध राखले जाणार असतील तरच ग्रामीण जनताही जंगलाचे संरक्षण करील. सरपण, चारा, खते, फळे, घरासाठी इमारती लाकूड इ. ग्रामीण जनतेच्या मूलभूत गरजा केवळ तत्त्वत: मान्य करून चालणार नाही तर त्या पुरविण्याचा व्यवस्था वनावकास व वनव्यवस्थापन याचे नियोजन करताना करण्यात आली पाहिजे.

## सामाजिक वनीकरण

गुरासाठी खाद्य आणि सरपण या ग्रामीण जनतेच्या गरजा भागविण्यासाठी सरकार सामाजिक वनीकरणास अधिकाधिक प्रोत्साहन देत आहे. जलद वाढ होणारे वृक्ष वाढतील अशा लक्षावधी हेक्टर जमिनी पडून आहेत. गरिबाच्या गरजा पुरवू शकणाऱ्या झाडाची लागवड करण्याकडे या जमिनीचा उपयोग होऊ शकेल. सामाजिक वनीकरणाच्या सकल्पनेत मूलभूत बदल आवश्यक आहेत. प्रत्यक्षात सामाजिक वनीकरणाची व्याख्या आपल्या अखत्यारीबाहेरील जमिनीवर झाडे वाढविणे अशी केली आहे. वनखात्याच्या अखत्यारी बाहेरील लागवडीखाली नसलेल्या जमिनीवर इधन, अन्न व गुरासाठी खाद्य पुरवू शकणारी यत्रणा उभारणे अशी सामाजिक वनीकरणाची नवीन व्याख्या करणे आवश्यक आहे. यामुळे जगलावर उपजीविकेसाठी अवलबून असणाऱ्यांना उपजीविकेचे पर्यायी मार्ग उपलब्ध झाल्यामुळे जंगलाच्या नाशाला आळा बसेल लागवडीखाली नसलेल्या जमिनीवरील उत्पादन वाढवून ग्रामीण जनतेचे जीवनमान उचावले जाईल. सामाजिक वनीकरण वाटते तेवढे सोपे नाही. चीन व कोरियातील अशा प्रकारच्या प्रयोगानी दाखवून दिले आहे की, सामाजिक वनीकरण-मोहीम यशस्वी व्हायची असेल तर सरकारचा दृष्टिकोण व कृती यात मूलभूत बदल आवश्यक आहेत. तसेच समाजव्यवस्थेमध्ये आणि जमिनीच्या उपयोगपद्धतीमध्ये सुधारणा होणे आवश्यक आहे.


सामाजिक वनीकरणापेक्षासुद्धा लोकाभिमुख अशा सामाजिक वननीतीची आज खरी निकड आहे. वनीकरणाची मोहीम केवळ वनखात्याबाहेरच नव्हे तर जगलाबाहेर काढून लोकापर्यंत पोहचविणे आवश्यक आहे.

## वनांचे स्वामित्व व व्यवस्थापन

आरक्षित वनावरील पूर्णत: व बऱ्याच प्रमाणात उत्पादक व सामाजिक वनावरील सरकारच्या स्वामित्वास पर्याय आहेसे दिसत नाही, परंतु स्थानिक गरजा भागविता येणाच्या दृष्टीने गावजगलावरील स्वामित्वाचे स्वरूप पुरेसे स्पष्ट होणे आवश्यक आहे. सरकारी वृक्षारोपण-कार्यक्रम अथवा वनशेतीच्या कार्यक्रमात सहभागी होण्यापूर्वी उत्पादनावरील मालकीचे स्वरूप स्पष्ट होणे आवश्यक आहे.

स्वामित्वाचे अनेक प्रकार आढळतात. उदा. खाजगी, सरकारी इ. गावजगले २० किंवा त्याहून अधिक वर्षे सामूहिक मालकीखाली असावीत. काही बाबतीत सामूहिक व्यवस्थापन अयशस्वी झाले असेल तरीही वनअधिकाऱ्याच्या गैरव्यवस्थापनास पर्याय उभा करणे अत्यत निकडीचे आहे. पूर्वापार चालत आलेल्या वनपचायतीचे पुनरुज्जीवन करण्याचे प्रयत्न व्हावेत. व्यवस्थापनाची पद्धत आखण्यात यावी तसेच जगलजमिनीच्या खरेदीविक्रीवर बधने घालावीत. स्थानिक गरजा पूर्ण होणार असतील तर सामूहिक व्यवस्थापनाला अर्थ आहे.

शत्रूवरही येऊ नये असा प्रसंग अचानक एका सुखी-समाधानी कुटुंबावर गुदरला; पण परिस्थितीने खचून न जाता त्यांनी अतिशय पद्धतशीरपणे या दुखण्याचा पाठपुरावा केला. त्यातून जाणवत गेली औद्योगिक 'विकासा'तील एक गंभीर समस्या – शिशाचे प्रदूषण आणि त्याहूनही भयावह जाणीव झाली – सामाजिक प्रदूषणाची ! त्याची ही सत्यकथा...



शरद गोगटे

# लेड पॉयझनिंग...डोळ्यांसमोर घडलेली घटना

१ एप्रिल १९७८, शनिवारचा दिवस होता. सोनालीची शाळा सकाळीच उरकली होती. दुपारी कोणाकोणाला एप्रिलफूल करण्याचा दंगा घालून झाला होता. संध्याकाळी ती अचानक खेळता खेळता पाय धरून खाली बसली. पायात गोळा आल्यासारखं झालंय म्हणाली. हाही एप्रिलफूल करण्याचा खेळ असावा असं प्रथम वाटलं; पण तसं नव्हतं. खरंच गोळे आल्यासारखं होत होतं. तशी ती गेले काही दिवस गुडघ्याखाली दुखत म्हणून तक्रार करत होती. तिचं तोंडही मधूनमधून सारखं येत होतं. डोकं दुखण्याची तक्रारही बऱ्याच वेळा करायची; पण त्या दिवशीची तक्रार नवीनच होती. तिच्या आतापर्यंतच्या तक्रारी तशा किरकोळ स्वरूपाच्या वाटणाऱ्या होत्या व त्यावर तात्कालिक घरगुती उपायही केले जात होते. उन्हात फार खेळल्यामुळं एखादवेळी गोळे येतात तसेच आले असतील असं वाटलं; परंतु दुसरा दिवस रविवारचा होता. डॉक्टर भेटणं कठीण म्हणून संध्याकाळीच शुभदा तिला आमच्या फॅमिलीडॉक्टरकडे घेऊन गेली. त्यांनाही उन्हाचा त्रास झाल्याने गोळे आले असतील असं वाटलं आणि म्हणून त्यांनी क्रोसीन वगैरे औषधं घ्यायला सांगितली.

रात्री परत तिच्या पायात गोळे आल्यासारखं झालं. औषधं देऊनही तिचं दुखणं वाढतच होतं. एक–दोन दिवसात दुखण्याचा जोर चांगलाच वाढला आणि सामान्यतः गोळा येऊन स्नायू कडक होतो त्यापेक्षा हा प्रकार जरा निराळाच होता. तिच्या पोटरीत किंवा मांडीत गोळा येत नव्हता, तर गुडघ्यापासून खालचा पाय ओढला जाऊन लंगडी घातल्यासारखा मांडीवर मागच्या बाजूने मुडपला जात होता हे होतानाच गुडघे आणि जांघांतील शिरा ताठरून जात होत्या. दुखण्याचा जोर वाढल्यावर पाय इतके जोरात वर ओढले जायचे की, ती पाठीवर झोपली असली तरी गुडघ्याखालचे पाय ओढले जाऊन शरीराच्या खाली मुडपले जायचे. साऱ्या शरीराची कमान झाल्यासारखं व्हायचे. साऱ्या शिरा आखडून कडक व्हायच्या. साहजिकच तिला असह्य वेदना होऊन ती विव्हळायला लागायची. अशा वेळी तिचे पाय ताठ करण्याचा अथवा ताठ ताणून ठेवण्याचा प्रयत्न केला तर तिला जास्तच वेदना व्हायच्या. याप्रमाणे आखडलेली स्थिती २०–२५ सेकंद टिकायची आणि ताण सुटून पाय सरळ व्हायचे. परत पाय मुडपले जायचे. केव्हा उजवा तर केव्हा डावा तर केव्हा दोन्हीही ! पेटीच्या भात्यासारखे तिचे पाय उघडले-मुडपले जायचे. तिला खूप वेदना व्हायच्या. ती थकून, शिणून जायची. हा सारा प्रकार सुमारे तास–दीड तास चालू रहायचा आणि दुखण्याचा जोर रात्री ९–९॥ च्या सुमारास वाढायचा. सोमवारी संध्याकाळी डॉक्टरांनी ब्रुफेनच्या गोळ्या दिल्या. त्या दिवशीची पहिली गोळी घेतली; परंतु त्या दिवशीही जोर आणखीनच वाढला. दुखणं वाढतच होतं. तिची पाचवीची परीक्षाही अगदी नजीक येऊन ठेपली होती आणि दुखणंही जगावेगळंच होतं. डॉक्टरांच्याकडे जात होतो तेव्हा तिच्या हालचाली नेहमीसारख्याच असत. त्या वेळी तिला कॉन्ट्रॅक्शन्स येत नसत. म्हणून सोमवारी रात्री जेव्हा तिचं दुखणं वाढलं आणि तिला वारंवार कॉन्ट्रॅक्शन्स यायला लागली तेव्हा मी

आमच्या डॉक्टरना फोन केला आणि कॉन्ट्रॅक्शन्स प्रत्यक्ष बघायला यायची विनंती केली. त्यानी फोनवरच 'दुखण्याचं स्वरूप माझ्या काही लक्षात येत नाही. बालरोगतज्ज्ञ × × हे तुमच्या ओळखीचे आहेतच. तुम्ही त्याना बोलवा' असं सांगितलं. मी त्याना फोन केला आणि त्याच्या सूचनेप्रमाणे सोनालीला त्याच्याकडे घेऊन गेलो. त्याच्याकडे तपासण्याच्या टेबलावरच सोनालीला १-२ कॉन्ट्रॅक्शन्स आली. त्यानी तपासणी केली. नक्की काय असावं याची त्यानाही निश्चित कल्पना येत नव्हती असं वाटलं. बहुधा मस्क्युलर-ऱ्हुमॅटिझम् असावा असा त्यानी अंदाज व्यक्त केला आणि ३।४ औषधाचे प्रिस्क्रिप्शन दिले. त्यात गार्डेनल नावाच्या गोळ्या व २-३ टॉनिक्स वगैरे होती. दोन दिवसांनी त्यानी परत बोलावलं होतं.

□

कॉन्ट्रॅक्शन यायला लागली की, सोनालीला झोप लागू शकत नसे. साधारण रात्री १-१॥ पर्यंत ती व तिच्याबरोबर आम्ही झोपू शकत नव्हतो. गार्डेनल घेऊनही या कार्यक्रमात फरक पडला नाही. उलट औषधामुळ झापड येऊन तिला त्रासच जास्त होऊ लागला. २-३ दिवसांनी डॉक्टरानी तिला कॅल्शिअम् ग्लुकोनेटच्या पाच इंजेक्शन्सचा कोर्स द्यायचं ठरविलं. तो कोर्स पूर्ण झाला आणि जेमतेम एक दिवस तिला कॉन्ट्रॅक्शन्स आली नाहीत. परत रोज रात्री तिला १॥-२ तास कॉन्ट्रॅक्शन्स यायला लागली. काही वेळा दिवसाही कॉन्ट्रॅक्शन्स येत होती. कॉन्ट्रॅक्शन आल्यावर पाठीच्या मणक्यातून सपूर्ण मागं वाकणारं शरीर, ताठरलेल्या शिरा आणि स्नायू, तिला होणाऱ्या तीव्र वेदना हे सारं बघवत नव्हत. प्रत्येक अटॅकनंतर ती अगदी गळाठून जात होती. अटॅक येणार या कल्पनेनेही ती धास्तावत होती. दरवेळी कॉन्ट्रॅक्शन आलं की तिच दुःख थोडंस सुसह्य करण्यासाठी तिचे ताठरलेले स्नायू आणि शिरा आम्ही हलक्या हातान चोळण्याचा प्रयत्न करत होतो. हे करत असताना आमच्या असं लक्षात आल होतं की, कमरेजवळच्या काही शिरांना जरा चोळलं की कॉन्ट्रॅक्शन त्यातल्या त्यात लवकर सुटत होतं त्याचप्रमाणे कॉन्ट्रॅक्शन्सचा अटॅक सुरू होण्यापूर्वी तिला पायाच्या शिरा आवळल्यासारख वाटत असावं. कारण ती पाय घट्ट झाले असं सागायची आणि अटॅक सपल्यावर पाय सैल झाले असं सागायची. हे आम्ही डॉक्टरांना सांगितलं आणि दुखणं वाढत असल्याचंही सांगितलं. त्यानी गार्डेनलचा डोस वाढवायला सांगितलं, हे आम्हाला बरोबर वाटलं नाही आणि दुसरा काही उपाय करायला पाहिजे असा निर्णय आम्ही घेतला.

दुखण वाढत होत, त्याचं निदानही होत नव्हतं, त्याच स्वरूप जगावेगळ होत. साहजिकच आम्हाला 'बाहेरचे उपाय' करून बघण्याच्या सूचना केल्या गेल्या. अर्थात शुभदा आणि मी दोघही असले काहीही उपाय करून बघण्याच्या विरुद्ध होतो आणि आम्ही या सूचनेकडे पूर्ण दुर्लक्ष केलं; परतु शुभदानं हे दुखण जगावेगळं आहे हे लक्षात घेऊन एक अत्यंत महत्त्वाची गोष्ट केली ती म्हणजे तिच्या दुखण्याविषयी रोजच्या रोज नोंद करायला सुरुवात केली. या नोंदीचा पुढं आम्हाला चागला उपयोग झाला.

यानतर आमच्या नातेवाइकाच्या ओळखीनं आम्ही एका प्रसिद्ध ऑर्थोपेडिक सर्जनना सोनालीला दाखवलं. दुपारी ३-३॥ च्या सुमारास आम्ही गेलो होतो. त्यांनी


With Best Compliments From

**Ballarpur Industries Limited**

Unit : BALLARPUR

P.O. : Ballarpur Paper Mill 442 901

Dist. : Chandrapur ( Maharashtra )

तिची सर्व प्रकारे तपासणी केली. तिला मागे पुढे चालायला, पळायला, उड्या मारायला लावल्या. विविध प्रकारे तिच्या हालचालीचे निरीक्षण केले. सुमारे पाऊणएक तासानं तिची तपासणी झाल्यावर त्यांनी आम्हाला सांगितलं की, ती नांकनी (चालताना गुडघे एकमेकांवर घासणे—आपटणे) आहे. त्यामुळं तिला उजवा पाय थोडा गोलाकार वळवून टाकण्याची सवय आहे. याचा ताण येऊन तिच्या उजव्या पायात कॉन्ट्रॅक्शन्स येत असतील. तिला करेक्टिव्ह शूज घातले की तिचा तक्रार हळूहळू नाहीशी होईल मी डॉक्टरांना विचारलं की उजवा पाय वेळा-वून टाकायची सवय लागल्यामुळं उजव्या पायात कॉन्ट्रॅक्शन्स यायला लागली तर डाव्या पायात कशामुळं आली असतील ? डॉक्टर म्हणाले, 'बघू' दुसऱ्या दिवशी करेक्टिव्ह शूज करण्यासाठी माप घ्यायला आला तेव्हा सोनालीला अतिशय जोरात कॉन्ट्रॅक्शन्स येत होती शूजसाठी मापं देणं शक्य नव्हतं. आम्ही त्या माणसाला केव्हा यायच ते मागून कळवू अस सांगून मार्गी लाव ा.

त्या दिवशी रात्री परत कॉन्ट्रॅक्शन्स यायला लागल्यावर शुभदा आणि मी आता काय कराव असा विचार करायला लागलो. दुखण्यावर उपायही होत नव्हता आणि दुखण्याच स्वरूप डॉक्टरमंडळीच्याही लक्षात येत नाही अस वाटत होत. कदाचित लक्षणा-नुरूप उपाय करणारी होमिओपाथी या परिस्थितीत उपयोगी पडेल असं आम्हाला वाटलं. कोणत्या होमिओपाथ डॉक्टरांना दाखवाव असा विचार करत असताना माझ्या एका मावशीनं (सौ. मालती माटे) होमिओ-पाथीचा कोर्स केला आहे हे मला आठवलं आणि मी तिला फोन केला. तीही रात्री दहा वाजता औषधाची पेटी व पुस्तक घेऊन आली; पण तिनं स्पष्टच सागितलं की कोर्स केलेला असला तरी आता विश्वासानं औषध देण्याइतकी तिची तयारी नाही तिन दुसऱ्या दिवशी आपटेरोडवरच्या डॉ. सोनूमामा तळवलकराकडे जायला सागितलं.

या दुखण्याचा विचार करताना आम्हाला कायम अस वाटल आहे की, केवळ आमच सुदैव म्हणून आम्ही सोनुमामाच्याकडे गेलो. सोनालीच दुःख वाढतच होत. तिला येणारी कॉन्ट्रॅक्शन्स बघून सामान्य माणसाला ही काही तरी बाहेरची बाधा आहे अस वाटलं असतं तर आश्चर्य नव्हत. तिच्या दुखण्याच्या बाबतीत पुढंही डॉक्टर्सची जी एकदर वृत्ती दिसली त्यावरून त्या वेळी जर तिला हॉस्पिटलमध्ये दाखल करण्याची वेळ आली असती तर, कदाचित् तिचे अधिक हालच झाले असते असं वाटत आणि म्हणूनच असही वाटत की, सोनालीच्या दुखण्याच्या बाबतीत आम्हाला सोनुमामाच्या रूपान देवच भेटला.

शुभदा-सोनाली व मी सोनुमामाच्याकडे दुपारी ४ च्या सुमारास गेलो. त्यांना सोनालीच्या कॉन्ट्रॅक्शन्सबद्दल सागितलं. त्यांनी विचारलं की, तिची बेंबी खोल गेली आहे का ? तिचं डोक अधूनमधून वेग-वेगळ्या ठिकाणी दुखत का ? आणि तिच्या पावलाच स्पर्शज्ञान कमी झाल आहे का ? कॉन्ट्रॅक्शन्स येत असताना आणि नतर तिला मालीश करताना तिची बेंबी सामा-न्यत: असते त्यापेक्षा खोल आहे, हे शुभदाच्या लक्षात आलेल होत. डोकं दुखण्याची तक्रार ही तिची होतीच. त्यामुळ पहिली दोन लक्षण जुळत आहेत हे आम्ही लगेचच साग


With Best Compliments From

**M/s. Andhra Pradesh Paper Mills Ltd.,**

RAJAH MUNDRI ( AP ) 533104

शकलो. माझ्या खुर्चीशेजारीच सोनाली उभी होती. तिच्या नकळत हात खाली करून मी तिच्या पावलाला आगठ्याजवळ स्पर्श केला. तिला तो कळला नाही याप्रमाणे सोनुमामानी विचारलेली तीनही लक्षणे जुळली होती. त्यानी 'सात दिवसाचे औषध देतो. सातव्या दिवशी पूर्ण आराम पडेल.' असं सांगितलं. या दुखण्याबाबत इतक्या आत्मविश्वासपूर्वक बोलणारे पहिलेच डॉक्टर भेटले होते.

त्यानी औषधाच्या सात पुड्या तयार केल्या. दर दिवशी ठराविक क्रमाने एका पुडीतील पूड ग्लासभर पाण्यात खूप ढवळून विरघळावयाची आणि ते पाणी दिवसभर थोडथोडं अस घेत रहावयाच अस त्यानी सांगितलं.

औषध सुरू केल आणि दुसऱ्या दिवशी सकाळपासूनच कॉन्ट्रॅक्शन्स यायला लागली. दुपारी त्याचा जोर आणखीच वाढला. ती सारखी ओरडायला आणि रडायला लागली. संध्याकाळी तिच्या हातातही कॉन्ट्रॅक्शन्स यायला लागली. मनगटापासून सारा पंजा आखडल्यासारखा व्हायचा, बोट वेडी-वाकडी होऊन ताठरायची. वरची पेरं वाकून कडक व्हायची आणि तिला खूप वेदना व्हायच्या थोडया वेळानं हातातले कमी होऊन मानेत झटके यायला लागले माने-पासून निखळल्यासारखं तिच डोकं आपोआप गदागदा हालायचं, मान सावरता येत नस-लेल्या मुलासारखी मान वाटेल त्या बाजूला फेकली जात होती. तिला सावरायला तिच्या दोन्ही बाजूना सतत कोणाला तरी बसावं लागत होतं. डोकं अतिशय दुखायला लागलं होतं. डोक्याला ती हातही लावू देत नव्हती. सोनुमामांना फोन केला तेव्हा त्यानी अत्यंत आत्मविश्वासपूर्वक होत आहे ते बरोबर आहे, औषध अगदी योग्य आहे' असं सांगितलं.

होमिओपाथीय लक्षणानुरूप उपाय होत असले तरी त्यामुळं रोगनिदान होईलच याची खात्री नव्हती. हे विचित्र दुखणं का व कशामुळं झालं हे कळल्याखेरीज त्याच्यावर कायम स्वरूपाच निदान होऊ शकणार नाही असं आम्हाला वाटत होतं. म्हणून डॉ. तळवलकराचं औषध चालू असतानाच मी डॉ. नी. अ. आठवल्याना फोन केला. ते ॲलोपाथ असून होमिओपाथीचाही त्याचा अभ्यास आहे हे माहिती असल्यामुळं मी त्यांना फोन करून दुखण्याची सर्व माहिती सागितली व पुढं काय करावं म्हणून विचारलं. त्यानी दुसऱ्या दिवशी मला भेटा-यला बोलावलं. त्याच्याकडे गेलो तेव्हा त्यानी एका होमिओपाथीच्या पुस्तकातील 'प्लंबम्' या औषधाची लक्षणं वाचायला दिली. त्यातली बरीचशी लक्षणं सोनालीला लागू पडत होती म्हणून मी डॉक्टरना विचा-रलं की हं औषध तिला लागू पडलं तर त्याचा अर्थ तिला झालेलं दुखणं हे शिश्या-मुळं झालेलं-- लेड पॉयझनिंग--समाजायचं का ?' त्यांनी सागितलं की 'ती एक शक्यता आहे. सोनुमामांनी दिलेलं औषध संपलं आणि तिला थोडा आराम मिळाला की आपण पुढं विचार करू.'

इकडे सोनालीला औषध चालूच होतं. हळूहळू तिच्या हातापायातील कॉन्ट्रॅक्शन्सच प्रमाण कमी कमी होत होतं. औषधाच्या पाचव्या दिवशी मानेतल्या झटक्याचं प्रमाण खूपच वाढल. रात्री तर इतक्या जोरात येऊ लागले की ती बसल्या जागी वर उठल्या-सारखी होऊन तिच्या अंगाची विचित्र कमान व्हायची. तिघा-तिघांना तिला साव-रणं कठीण झालं होतं. आता मानेतील झटक्याच्या वेळी तिला मान घट्ट आवळल्या-सारखं होऊन ती जोरात ओरडत होती. शुभदाच्या आई आल्या होत्या त्या म्हणायला लागल्या 'कोणा चागल्या डॉक्टरना का नाही दाखवत ?' डॉ तळवलकरांना रात्री दहाच्या सुमारास फोन केला. त्यानी परत शांतपणे 'चाललय ते योग्यच आहे, फक्त उद्या सुरू करायची पुडी लगेच आताच सुरू करा !' असं सागितलं. त्याप्रमाणे ती पुडी सुरू केली आणि रात्री बाराच्या सुमारास झटके थावले. दुसऱ्या दिवशी झटक्याचे प्रमाण अगदीच थोडं आणि सौम्य होते. कित्येक दिवसानी प्रथमच सोनाली रात्री दहाच्या आत झोपू शकली. पण ११॥–१२ च्या सुमाराला तिला जाग आली. मानेत सौम्य झटके आले, मग पायात आले आणि रात्री तीनच्या सुमारास ती परत झोपून गेली.

आश्चर्य म्हणजे औषध सुरू केल्यापासून सातव्या दिवशी २७ एप्रिल १९७८ रोजी सोनालीला एकही झटका आला नाही. दुसऱ्या दिवशी सोनूमामाकडे गेल्यावर गेल्या सहा–सात दिवसात दिसलेली लक्षणं प्रत्य-क्षात केव्हा तरी झालीच असती असा त्याचा अंदाज सोनूमामानी सांगितला. त्याच्या मते औषधामुळे ही सर्व प्रक्रिया लवकर होऊन गेली. सहाजिकच आम्ही त्यांना विचारलं की, दुखण्यावर प्लंबम् लागू पडल म्हणजे हा लेड पॉयझनिंगचा प्रकार होता का ? त्यांच्या मते तस निश्चितपणे ठरविण कठीण होतं. कारण होमिओपाथीत लक्षणानुरूप औषधयोजना केली जाते; परंतु त्यावरून लगेच दुखण्यावर लेडपॉयझनिंगचा शिक्का मारणे योग्य होणार नाही. डॉ. आठवल्याच्या मते मात्र हा प्रकार बहुधा लेड पॉयझिंगचाच होता; परतु तिला येणारे झटके हे मज्जासस्थेतून उद्भवल्या-सारखे होते लेड पॉयझनिंगमध्येही मज्जा-संस्थेवर परिणाम होण्याची शक्यता असते तेव्हा सोनालीच्या मज्जासंस्थेत काही बिघाड झालेला नाही ना हे चागल्या न्युरॉलॉजि-स्टला दाखवून खात्री करून घ्यावी. त्या-प्रमाणे त्यानी मुबईच्या एका प्रसिद्ध न्युरॉ-लॉजिस्टशी भेट ठरवली. शुभदान दुखण्याच्या ज्या नोदी ठेवल्या होत्या त्या आधारे सर्व लक्षणाचे तपशीलवार टिपण करून मुबईच्या न्युरॉलॉजिस्टकडे पाठवून दिले.

मे महिन्यातही तिला मधून मधून थोडा-फार त्रास होत होता. दर वेळी प्लबम् दिलं की तो कमी व्हायचा–थाबायचा. मेच्या मध्यावर त्यानी तिला कल्केरिआ कार्ब कॉन्स्टिटयूशनल रेमिडी म्हणून नियमित घ्यायला सांगितल.

याच सुमारास मी ब्रिटिश कौन्सिल लायब्ररीत जाऊन लेड पॉयझनिंगसंबधी वाचून माहितो मिळविण्याचा प्रयत्न केला. प्रथम मेलॉरच्या 'ट्रिटाईज ऑन थेअरॉटिकल इन्‌ऑरगॅनिक केमिस्ट्री'च्या सातव्या खंडा-तील शिसेधातूवरील संबधित भाग वाचला.

**औषध सुरू केलं आणि दुसऱ्या दिवशी सकाळपासूनच कॉन्ट्रॅक्शन्स यायला लागली.**

रोमन साम्राज्याचा ऱ्हास होण्याची जी अनेक कारणे आहेत त्यापैकी लेड पॉयझनिंग हेही एक महत्त्वाचे कारण आहे इत्यादी इतिहास वाचला. लेड पॉयझनिंग हे मुख्यत. शिशाशी संबंधित उद्योगात काम केल्याने होते. हे उद्योग म्हणजे छपाईची जुळणी, टाईप फाउंडरी, ड्रायसेल बॅटरीज, लेड पेंटस् इ. लहान मुलानी ऑइलपेंटस्नी रंगवलेली खेळणी चोखल्यामुळे, ऑइलपेंटने रंगवलेल्या भिंतीचे पोपडे खाल्ल्यामुळे, पाणीपुरवठ्याचे नळ शिशाचे असल्यामुळे किंवा पाण्याच्या नळाच्या जोडकामात शिसे वापरलेले असल्यामुळे वगैरे माहिती मिळाली. लेड पॉयझनिंगच्या प्राथमिक लक्षणात डोकेदुखी, पोटदुखी, पोटशूळ, मळमळ, अपचन, बद्धकोष्ठ, भूक जाणे, पायात गोळे येणे, स्नायूची ताकद कमी होणे, अंगात चमका येणे याचा समावेश होतो. ही सर्व लक्षणे आपल्याकडे इतकी सहज आणि विविध कारणानी आढळू शकतात की या लक्षणावरून काही अनुमान बांधणे कठीण होते. एक बाब जाणवली की धाकटी मोतिया बऱ्याच वेळा मळमळण्याची तक्रार करते व अलीकडेच शरिरातील कोणत्याही भागातून चमक आल्याची तक्रार करायला लागली होती. तथापि एक अगदी वेगळंच लक्षण लेड पॉयझनिंगचं म्हणून वाचण्यात आलं. ते म्हणजे लेड पॉयझनिंग झालेल्या व्यक्तीच्या हिरड्यावर एक अखंड काळपट निळी रेषा दिसते. शुभदाने बघितलं तर दोघी मुलींच्या हिरड्यांवर निळी रेषा दिसली. आता प्रश्न पडला की, दिसते आहे तशीच रेषा लेड पॉयझनिंगची असते का वेगळी ? आपल्या बऱ्याचशा डॉक्टर्सना ( लेड पॉयझनिंगच्या केसेस बघण्याची वेळ सहसा येत नसल्यामुळे) ही रेषा कशी असते याची निश्चित कल्पना नव्हती.

मग मुंबईच्या न्युरॉलॉजिस्टकडे ठरलेल्या दिवशी गेलो. आम्ही सर्व जण व डॉ. आठवले दुपारी ३॥ च्या सुमारास डॉक्टरांच्या कन्सल्टिंग रूमवर पोचलो. भेट ठरलेली असल्यामुळे फारस खोळंबावं लागलं नाही. डॉक्टरांनी सोनालीची अत्यंत काळजीपूर्वक आणि बारकाईने तपासणी केली. तिच्या सर्व अवयवाच्या हालचाली, त्याच्या स्वाभाविक प्रतिक्रिया इत्यादीची चाचणी घेतली. तपशीलवार तपासणीनंतर तिच्यात न्युरॉलॉजिकली काहीही बिघाड नाही व त्या दृष्टीने काळजी करण्यासारखे काही नाही असं त्यानी सांगितलं. त्यानी तिला आलेल्या कॉन्ट्रॅक्शन्सबद्दल असं सांगितलं की, स्वतंत्रपणे ही लक्षणे न्युरॉलॉजिकल बिघाडाची आहेत; परंतु ती सर्व वेगवेगळ्या न्युरॉलॉजिकल रोगात दिसणारी लक्षणे एकत्रित झालेली अशी दिसतात. कोणत्याही एका रोगाच्या लक्षणांशी तिची लक्षणं जुळत नाहीत. ती हुशार आणि संवेदनाक्षम मुलगी आहे. काही मानसिक आघात अगर अप्रिय परिस्थिती यामुळे तिचं दुखणं निर्माण झालं असेल का याचा शोध घेण्याचा सल्ला त्यानी दिला. डॉ. आठवले यानी होमिओपाथिक ट्रिटमेंटबद्दल व प्लंबम् लागू पडल्यामुळं आलेल्या लेड पॉयझनिंगच्या शंकेबद्दल सांगितलं. डॉक्टराचा होमिओपाथीवर बिलकूलच विश्वास नव्हता. ते म्हणाले प्लंबिझमवर प्लंबम् घेऊनच कसा उपचार होणार ? ते औषध फेकून द्या. तिला खास औषधोपचाराची काही जरुरी नाही.

¤

एका बाजूला न्युरॉलॉजिकल दुखणे नसल्याचे समाधान व दुसऱ्या बाजूला दुखणे मानसिक असण्याची आशंका आणि काळजी घेऊन आम्ही पुण्याला परतलो. सोनाली मानसिकदृष्टया एक सुस्थिर मुलगी आहे असं आमचं मत होतं. तिच्या वागण्यातील काहीसा असमतोल, हट्टीपणा, चिडखोरपणा इत्यादी तिच्या दुखण्यानंतर व दुखण्यामुळे निर्माण झालेल्या बाबी आहेत असं आम्हाला वाटत होतं; परंतु शंका नको म्हणून शाळेच्या मुख्याधिपिका, शाळेतील तिच्या शिक्षिका या सर्वांशी आम्ही बोललो. एक हुशार आणि शाळेच्या सर्व कार्यक्रमात उत्साहानं भाग घेणारी मुलगी म्हणून शाळेत शिक्षकाना ती चांगली माहिती होती. तिला मैत्रिणीही खूप होत्या ही सारी मानसिक असतुलनाची लक्षणे निश्चितच नव्हती. तथापि आम्ही बोलल्यानंतर शाळेतील शिक्षकवर्गाने तिच्या दुखण्याबद्दल चांगलं आणि दाखविलं. तिला योग्य ती सहानुभूतिपूर्वक वागणूक मिळाली.

या सुमारास तिच्या मांड्यांवर निळसर काळे डाग आले. सोनूमामांना त्याबद्दल सांगितलं तेव्हा तिला ज्यामुळे त्रास झाला तो सगळा विषार बाहेर पडतो आहे. ते डागही काही दिवसांनी जातील, काळजी करू नका असं त्यानी सांगितलं. ते डाग यथाकाल गेलेही.

यानंतर ७९ मार्च-एप्रिलपर्यंत दर दीड महिन्यानं सोनालीला त्रास व्हायचा. थोडीफार कॉन्ट्रॅक्शन्स यायची आणि त्यानंतर अनेक प्रकारची लक्षणं दिसायची. एक महत्त्वाचा परिणाम म्हणजे तिची झोप उडल्यासारखी व्हायची. झोपायचा प्रयत्न करूनही तिला झोपच लागत नसे. कित्येक वेळा निद्रानाशाबरोबर तिला खूप भीती वाटायला लागायची. ती भीती अकारण आहे हे तिचं तिला कळूनही तिला वाटतच राहायची. काही वेळानंतर डोळे मिटल्यावर भीती वाटते म्हणून ती डोळेच मिटत नसे. काही वेळा तिला गुंगी येत असे, बेभान व्हायला होत असे. किंबहुना दर वेळी शारीरिक व मानसिक लक्षणाचं ठराविक वेळापत्रक असल्यासारखं एकापाठोपाठ एक अशी सर्व लक्षणं दिसायची आणि त्या लक्षणांनुरूप प्लंबम्, क्युप्रम्, ऑरम्, ॲकोनाइट, नक्समोस्चेटा इत्यादी औषधांचा परिपाठ व्हायचा आणि तिला आराम पडायचा. दर वेळी साऱ्या लक्षणांची तीव्रता थोडी-फार कमी झाली आहे असं जाणवायचं. सोनूमामा यथाकाल सर्व ठीक होईल, तिचं दुखणं पूर्ण बरं होईल असा विश्वास आणि दिलासा देत असत.

मध्ये सुमारे वर्षभर म्हणजे फेब्रुवारी १९८० पर्यंत तिला काही त्रास झाला नाही. या काळातही आम्ही आमच्या माहितीतल्या व नात्यातल्या अनेक डॉक्टराशी हे दुखणं लेड पॉयझनिंगचं असेल का व असल्यास याचा नक्की छडा कसा लावता येईल यासंबंधी बोलत होतो; परंतु त्याबद्दल कोणत्या परीक्षा कराव्यात इत्यादीविषयी निश्चित दिशा कोणी सुचविली नाही व सोनालीच्या

**दुपारी त्याचा जोर आणखीच वाढला. ती रडायला-ओरडायला लागली.**

दुखण्यातही काहीसा खड पडल्यामुळ आमच्याकडूनही त्या बाबतीत नेट लावला गेला नाही.

फेब्रुवारी १९८० मध्ये तिला परत सुरू झालेल दुखणं सुमारे दीड महिना चाललं. शारीरिक आणि मानसिक लक्षणाच्या ठल्याप्रमाणे सर्व परी झाल्या आणि ठरलेली औषधं त्याच क्रमान दिली गेली. दीड-एक महिन्यान तिला आराम पडला तो साधारण वर्षासाठी. जानेवारी १९८१ मध्ये तिला परत त्रास सुरू झाला.

## ती टेस्ट घेतली का ?

मध्यंतरात मोतियाची पोट दुखण्याची तक्रार अधूनमधून उद्भवत होतीच तिची मळमळीची आणि सबध शरीरातून कोठून तरी चमका निघण्याची तक्रारही कायमच होती. डॉक्टराना अपेंडिक्सच्या त्रासाची शका आली डॉ. मकरद पराजपे यांनी योग्य त्या तपासण्यानतर ऑपरेशन करण्याचा निर्णय घेतला आणि मोतियावर अपेंडिक्स काढून टाकण्याची शस्त्रक्रिया केली. इतर डॉक्टर्स-प्रमाणे डॉ. मकरद पराजपे याच्याशीही आम्ही सोनालीच्या दुखण्याबाबत बोललो होतो व त्यानीही ही प्लबिझम् (लेड पॉयझनिंग)ची केस असण्याची शक्यता व्यक्त केली होती व त्याबाबत कोणत्या परीक्षा वगैरे करायला पाहिजेत हे वाचून सागेन अस म्हणाले होते. मोतियाच्या ऑपरेशनच्या निमित्तानं आमची वारंवार गाठ पडल्यामुळं आम्ही त्यांना सोनालीच्या दुखण्याबाबतही वारंवार आठवण देऊ शकलो. परिणामी त्यांनी जरूर ती माहिति मिळविली आणि एक दिवस त्यानी सोनालीच्या पायांचे एक्सरे काढण्याची सूचना केली. डॉ. तपस्वीशी ते याबाबत आधी बोलले होतेच.

२७ फेब्रुवारी १९८१ रोजी डॉ. तपस्वीनी सोनालीच्या गुडघे व नडगीच्या हाडाचे व कोपरापासून पंजासह हाताचे एक्स–रे काढले. तिच्या नडगीच्या हाडाच्या वरच्या बाजूला हेवी मेटल डिपॉझिटच्या म्हणता येतील अशा प्रकारच्या आडव्या रेषा आढळून आल्या. चार हेवी मेटलसपैकी लेड–शिसे हे एक आहे. तिच्या दुखण्याची लक्षणं व एक्स-रेचे अनुमान वापरून तिच दुखण लेड–पॉयझनिंग हेच असाव या निष्कर्षाला पुष्टी मिळत होती. तथापि डॉ. तपस्वीनी इतर परीक्षाद्वारे खात्री करून घेण्याबद्दल सुचविल होतं. इतर परीक्षा कोणत्या हा प्रश्न होताच.

या बाबतीत विचार चालू असतानाच लेड पॉयझनिंग कशामुळं होण्याची शक्यता आहे याची माहिती मिळवायला लागलो. मिळालेल्या माहितीप्रमाणे सोनालीला कपबशी, चिनीमातीची भाडी (ग्लेझ्ड पॉटरी) वर्ज्य केली. साधारणत: आपल्या वापरात टिन्डफूड येत नाही; पण ते कटाक्षानं टाळायला सुरुवात केली. कल्हईमध्ये शिश्याची भेसळ असेल या कल्पनेनं कल्हईची भाडी वापरातून काढून टाकली. रंगाच्या उत्पादनात शिश्याचा वापर बराच होतो असं वाचनात आलं होतं पाटील इस्टेटच्या मागच्या बाजूला नदीपलीकडे एक रगाचा कारखाना आहे तो पाटील इस्टेटच्या पूर्वेकडे येतो. साधारण ऑक्टोबर-नोव्हेंबरपासून पूर्वेचा वारा सुरू होतो. त्या वाऱ्याबरोबर शिशाचे अतिसूक्ष्म कण वाहून *येऊन त्यामुळं तर सोनालीला त्रास होत* नसेल ना अशी एक शका आली. कारण होमिओपाथिक पुस्तकात प्लंबम्ची लक्षणं वाचताना अतिशय सेन्सिटिव्ह केसेसमध्ये नवान ऑइलपेंट दिलेल्या खोलीत वावरूनही प्लबिझम्ची लक्षण उद्भवल्याच दिल होतं. तसच लेड पॉयझनिगबद्दल वाचताना एक केस अशीही वाचण्यात आली होती की, नेमबाजीचा सराव करण्याच्या मैदानाचा चराऊ कुरण म्हणून वापर केल्यामुळ तिथं चरणाऱ्या गाईंच्या दुधात शिसं आढळून आलं. त्याचप्रमाणे पाटील इस्टेटसमोरील मुबई–पुणे रस्त्यावरील प्रचंड रहदारीमुळ तर लेड पोल्यूशन होत नसेल ना अशी शका आली होती. पेट्रोलमध्ये मिसळलेल्या टेट्राएथिल लेडमुळे हवेतील शिशाच प्रमाण वाढत असल्याबद्दल वाचनात आल होतं. विशेषत: रहदारी थाबून वाहनातून जो धूर सोडला जातो त्यातून हे प्रमाण जास्त वाढत. यापैकी मागील बाजूच्या रंगकारखान्याबाबत शका निरसन करून घेण्याचा विचार शुभदानं व मी केला आणि डेप्युटी डायरेक्टर ऑफ इंडस्ट्रिअल हेल्थ याच्या कचेरीत चौकशी-साठी गेलो.

त्याना सोनालीची सर्व लक्षणं सागितली आणि त्या रगाच्या कारखान्याबाबत चौकशी केली. मी विचारताना हे स्पष्ट केल की, त्या कारखान्याच्या उत्पादनामुळ सर्वसामान्यपणे काही लेडपॉयझनिंगचा धोका निर्माण झाला आहे असं मला म्हणायच नाही. कदाचित सोनाली अपवादात्मकरीत्या शिशाच्या बाबतीत सेन्सिटिव्ह असेल आणि त्यामुळं तिला त्रास होत असेल. परतु त्या कारखान्याच्या उत्पादनात शिशाचा काही प्रमाणात तरी वापर होतो का ? जर होत असेल आणि त्याचा परिणाम सोनालीच्या प्रकृतीवर होत असेल तर आम्ही काय काळजी घ्यावी ? डेप्युटी डायरेक्टरसाहेबानी माझं म्हणणं ऐकून घेतलं आणि त्या कारखान्यात शिशाचा काहीही वापर केला जात नाही असं मला सागितलं. त्याचबरोबर त्यानी मला असंही सागितल की सोनालीची लक्षण ही लेडपॉयझनिंगची नाहीतच. त्यान ही तिचं दुखणं मानसिक स्वरूपाचं असण्याची शक्यता वाटत होती. त्याच्या मते एक्सरेला काही अर्थ नाही. 'तुम्ही कॉप्रोपॉर्फिरिन टेस्ट केलीत का ? त्याशिवाय तुम्ही लेड पॉयझनिंग आहे असं म्हणताच कस ?' असा खडा सवाल त्यानी मला केला. मी सर्व ऐकल आणि मनाशी म्हणालो, 'चला, लेडपॉयझनिंगसाठी कॉप्रोपॉर्फिरिन टेस्ट करावी लागते हे तरी कळलं. (पुढे या टेस्टबद्दल 'ती निदानच्या दृष्टीन फारशी उपयोगी नाही' अशी माहिति वाचण्यात आली 'Urinary coproporphyrin is increased in lead poisoning and this estimation may be useful in long term soreening of lead workers, **but is of no specific diagnostic value in poisoning**'—*Polson & Tattersall in Clinical Toxicology*)

डॉ पराजपे याना कॉप्रोपॉर्फिरिन नामक काही टेस्ट असल्याबद्दल सागितले. त्यानी त्याच्या माहितीतील पॅथॉलॉजिस्टकडे चौकशी केली. परतु त्याना या टेस्टबद्दल नक्की माहिती नव्हती आणखी २–३ पॅथॉलॉजिस्ट-कडे चौकशी केली परतु त्यापैकी कोणालाच ती टेस्ट करण्याची कधी वेळ आली नव्हती, त्यामुळे त्या टेस्टबद्दल माहिती नव्हती. शेवटी डॉ मनोहर धारपुरे यानी त्या टेस्टबद्दल वाचून ती करून बघायचे ठरविले. त्यांनी ४।३।८१ रोजी केलेल्या परीक्षेत कॉप्रोपॉर्फिरिंस आढळून आली नाहीत. त्यांनी एक्सरे आणि सोनालीच्या

हिरड्यावरील निळी रेषा बघितली होती आणि कॉप्रोपॉर्फिरिन टेस्ट मात्र निगेटिव्ह होती. त्यानी मला ए. एफ्. एम् सी. मध्ये जाऊन त्याच्या बायोकेमिस्ट्री विभागात या केससंबंधी विचारावयास सांगितलं. त्यासाठी गुरुवारी माझे मित्र श्री. राम पारुंडेकर यांच्याबरोबर आर्म्ड फोरसेस मेडिकल कॉलेजमध्ये जायचं ठरवलं.

त्या दिवशी ब्रिटिश कौन्सिल लायब्ररीत गेलो. बॉइडस् पॅथॉलॉजी हे नाव पुस्तकाच्या व्यवसायात असल्यामुळं कानावरून गेलेलं होत. त्या पुस्तकात काही माहिती मिळते का बघावी असा विचार होता. त्या पुस्तकात फार महत्त्वाच्या अशा दोन गोष्टी वाचायला मिळाल्या. एक म्हणजे उन्हाळ्याच्या सुरुवातीला, ऊन तापायला सुरुवात झाली की प्लंबिझमच्या केसेस वाढतात. कारण शरिरात उन्हामुळं होणाऱ्या रासायनिक प्रक्रियामुळ हातावर बसलेलं शिसं रक्तात व रक्ताद्वारे मेंदूत पोचून लेडपॉयझनिंगची लक्षण दिसू लागतात. सोनालीला दरवर्षी साधारणपणे उन्हाळ्याच्या सुरुवातीलाच का त्रास होत होता याचं कारण हे असू शकेल असं वाटतं. दुसरी महत्त्वाची माहिती मिळाली ती अशी की, एक्सरेमध्ये दिसणाऱ्या हाडांवरील शिशाच्या आडव्या रेषा या निदानाच्या दृष्टीने फार महत्त्वाच्या आहेत. कारण अगदी माइल्ड केसेसमध्येही या रेषा दिसून येतात.

गुरुवारी ए. एफ. एम सी. मध्ये गेलो. प्रथम बायोकेमिस्ट्री मग पॅथॉलॉजी, रेडिऑलॉजी इत्यादी विभागातून फिरलो. त्यापैकी कोणीच याबाबतीत काही ठरवू शकत नव्हतं अखेर फोरेन्सिक विभागात गेलो. तिथे डॉ. महंताना भेटलो. त्यांनी सर्व हकिगत ऐकून घेतली आणि त्याना ही केस लेड पॉयझनिंगची असण्याची शक्यता वाटली; परंतु हे निदान निश्चित करण्याचा त्यांच्या मते एकच मार्ग म्हणजे तिच्या रक्तात किती शिसं आहे हे तिच्या रक्ताचं रासायनिक पृथक्करण करून शोधून काढणं. दुर्दैवानं ए. एफ. एम. सीमध्ये अशा प्रकारच्या पृथक्करणाची सोय नव्हती. पुण्यात असं पृथक्करण कोठे करून मिळेल याचा तपास करणं जरूर होतं. बोलता बोलता त्यानी बाजारातील हळदीला कृत्रिम रंग देत असल्यानं अशी हळद कदाचित लेडपॉयझनिंगला कारणीभूत असण्याची शक्यता बोलून दाखवली. त्या दिवसापासून रोजच्या स्वैपाकातील हळदीचा वापर बंद केला !

डॉ. पराजप्यांना ही सर्व हकिगत आणि डॉ. महंतांची सूचना सांगितली. त्यानी विचार करून एन सी. एल. मध्ये अशा प्रकारचं रक्ताचं पृथक्करण होऊ शकेल का याची चौकशी केली. त्यांनी काही केसेसमध्यें बाहेरच्या डॉक्टर्सना अशा प्रकारचे सहकार्य दिल आहे असं कळल्यावरून एन्सीएल्मध्ये सोनालीला ११–३–१९८१ रोजी घेऊन गेलो. त्यानी सोनालीचं १०० सी. सी रक्त घेतलं. तिच्या रक्तात १०० मायक्रोग्रॅम। १०० सीसी इतकं शिस आढळून आलं. १९७८ साली तिच्या दुखण्याचा जेव्हा प्रथम उद्रेक झाला त्या वेळेपेक्षा यदा तिला पुष्कळच कमी त्रास होत होता आणि यंदा सुरू झालेला त्रासही एव्हाना औषधपाण्यानं बराच कमी झाला होता. याचा अर्थ आताच्यापेक्षा किती तरी जास्त शिसं तिला प्रथम त्रास झाला तेव्हा तिच्या रक्तात असलं पाहिजे. सध्या असलेलं प्रमाणही या बाबतीतल्या सहनशक्ति–मर्यादे (टॉलरन्स लेव्हल) पेक्षा तिपटीहून अधिक होतं.

डॉ. सोनूमामा तळवलकरांना पृथक्करणाचा तपशील सांगताच त्यानी प्लंबम्चा एक एम् ताकदीचा डोस दिला. त्यामुळं तिला परत सर्व लक्षणाच्या चक्रांतून जाव लागलं; परंतु २७–३–८१ रोजी परत केलेल्या तपासणीत शिशाचं प्रमाण ६० मायक्रोग्रॅम / १०० सी सी इतकं कमी झालेलं आढळून आलं. या वेळी आम्ही आमच्या घरातील नळाचं पाणी आणि मोतियाचं रक्त यांचही पृथक्करण करून घेतल. नळाच्या पाण्यात बिलकूल शिस आढळलं नाही; परंतु मोतियाच्या रक्तातील प्रमाण मात्र ५० मायक्रोग्रॅम / १०० सी सी इतक म्हणजे सहनशक्ती–मर्यादेच्या (३० मायक्रोग्रॅम / १०० सीसी) दीडपटीहून जास्त आढळून आलं. अपेंडिक्सच्या ऑपरेशननंतरही तिची मळमळीची तक्रार कायमच होती. तेव्हा तिलाही प्लंबम् देण्याचं ठरविलं आणि त्याचा सुपरिणाम दिसू लागला.

आता प्रश्न होता की, इतक्या मोठ्या प्रमाणात शिस कोठून आणि कसं ग्रहण होत आहे? मुलीच्याप्रमाणे आमच्याही रक्तात शिस आहे का? आमच्या रक्तात नसेल तर मुलीनी घर आणि घराचा परिसर सोडून इतरत्र कोठे तरी शिसं ग्रहण केलं असलं पाहिजे किंवा त्या वापरत असलेल्या एखाद्या वस्तुद्वारे त्यांनी ग्रहण केलं असलं पाहिजे. या साऱ्या प्रश्नाचा निकाल लावण्यासाठी आम्ही आमच्या रक्तातील शिशाचं प्रमाण काढून घेण्याचं ठरविलं. १४–४–८१ ला आम्ही आमच्या रक्ताचं पृथक्करण करून घेतलं आणि आणि आमच्या दोघांच्याही रक्तात ५० मायक्रोग्रम / १०० सीसी इतकं शिसं आढळून आलं. मला काहीही त्रास नव्हता; परतु शुभदाच्या चेहऱ्यावर साधारण तपकिरी रंगाचे डाग गेल्या वर्षदीड वर्षापासून दिसत होते. प्लंबमच्या लक्षणामध्ये त्वचेवरील तपकिरी डाग हे लक्षण आढळून आलं. (शुभदानं प्लंबम् घेऊन आता तिचे डाग हळूहळू गेले आहेत.) म्हणजे आम्ही सर्वजणच कोठून तरी शिसं ग्रहण करत होतो. हे फक्त आम्हीच करत होतो का आमच्या आजूबाजूचे इतर लोकही करत होते? विचार करता करता आजूबाजूच्या तीन–चार जणाच्या दुखण्याची लक्षणं लेडपॉयझनिंगमधून उद्भवल्यासारखी वाटली. यात दोन प्रौढ स्त्रिया होत्या, एक सोनालीच्याहून थोडी लहान मुलगी आणि एक तिच्याहून थोडा मोठा मुलगा होता. यापैकी दोन्ही स्त्रियाचे गेल्या ३।४ वर्षात सांधे आखडत गेले होते. दोघींच्याही हालचाली अतिशय मंदावल्या होत्या दोघींचीही शरीरं खंगत चालल्यासारखी दिसत होती. एका बाईंना पायसुद्धा उचलून टाकणे कठीण होऊ लागल होतं तर दुसऱ्या बाईंना मानसुद्धा न वळविता येण्याइतके सांधे आखडले होते. साधारण सोनालीच्या वयाची जी मुलगी होती तिला थोडा-फार सोनाली-

**प्रश्न असा होता की, इतक्या मोठ्या प्रमाणात शिसं कोठून आणि कसं ग्रहण होत आहे?**

सारखाच त्रास होत होता आणि जो मुलगा होता त्याला अधूनमधून पोट दुखण्याचा त्रास होत होता. आम्ही यापैकी जे तयार असतील त्यांच्या रक्तातील शिशाचं प्रमाण अजमावून घ्याव असा विचार केला. यापैकी एक बाई त्याच सुमारास आजारपण वाढून त्यातच दगावल्या. दुसऱ्या बाईच्या रक्तात ६० मा. ग्रा. । १०० सी सी इतकं शिसं आढळलं. त्या मुलाच्या रक्तात २३ मा. ग्रा. १०० सी सी आणि मुलीच्या रक्तात ३३ मा. ग्रा. । १०० सी. सी. इतकं शिसं आढळून आलं.

□

वर्ल्ड हेल्थ ऑर्गनायझेशनच्या अभ्यासाप्रमाणे साधारणतः शहरी भागात १७ मा ग्रा. १०० सीसी इतकं शिसं आढळून येतं. तपासणी केलेल्या सर्व केसेसमध्ये या सरासरीपेक्षा जास्तच शिसं आढळून आल आणि सातापैकी फक्त एक केस वगळून सर्व केसेसमध्ये ३० मा. ग्रा. । १०० सीसी या सहनशक्ती मर्यादेपेक्षा जास्त शिस आढळून आलं. आमच्या दृष्टीनं आम्ही राहत असलेल्या पाटील इस्टेट भागात कोठून तरी शिशाचा प्रादुर्भाव होत होता आणि तेथील रहिवाशाना प्रदूषणाचा धोका आहे असं मानण्यासारखी ही परिस्थिती होती आणि हे प्रदूषण पिण्याच्या पाण्यातून होत नव्हतं. कारण पाण्यात बिलकूल शिसं आढळलं नव्हतं. म्हणजे प्रदूषण हवेतून होत असण्याचीच शक्यता होती. मुलीच्या प्रकृतीच्या दृष्टीनं त्याना अधिक काळ या वातावरणात ठेवण धोकादायक होतं एव्हाना जुलै उलटून गेला होता. त्याच्या शाळा सुरू झालेल्या हो त्या. तरीही १ सप्टेंबर १९८१ पासून भुसावळच्या शाळेत प्रवेश घेऊन त्याना भुसावळला माझ्या आईवडलांकडे पाठवून दिल. हा कार्यभाग उरकल्यानंतर पाटील इस्टेटमधील प्रदूषणाबाबतची सर्व माहिती व मिळालेल्या रिपोर्टस्च्या प्रती, महाराष्ट्र प्रिव्हेन्शन ऑफ वॉटर पोल्यूशन बोर्ड, महाराष्ट्र स्मॉल स्केल इंडस्ट्रीज डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन, पुणे महानगरपालिकेचा आरोग्यविभाग इत्यादीकडे पाठवली व याबाबतीत पुढे चौकशी करण्याबद्दल कळविले. यापूर्वी जून १९८१ मध्ये मी याच प्रकारचं पत्र डेप्युटी डायरेक्टर ऑफ इंडस्ट्रिअल हेल्थ याच्याकडे पाठवलं होतं. त्या पत्राची पोचही आली नव्हती त्या मानानं या वेळी बराच चांगला प्रतिसाद मिळाला. नोव्हेंबर १९८१ ला प्रिव्हेन्शन ऑफ वॉटर पोल्यूशन बोर्डाकडून माझं पत्र एअर पोल्यूशन कंट्रोल विंगकडे पाठविल्याच मला कळविण्यात आल. याच सुमारास स्मॉल स्केल इंडस्ट्रीज डेव्हलपमेंट बोर्डाकडून त्याच्या पत्रासह माझं पत्र अर्बन डेव्हलपमेंट अॅन्ड पब्लिक हेल्थ डिपार्टमेंटला पाठविल आणि त्या विभागानं कार्यवाहीसाठी पोल्यूशन बोर्डाकडे पाठविलं. महानगरपालिकेचे सहाय्यक आरोग्यप्रमुख स्वत: येऊन चौकशा करून गेले आणि 'आणखी काही माहिती मिळाल्यास कळवा' असं सांगून गेले. त्यानतर मात्र गेल्या पावणेदोन वर्षांत पुढं काय हालचाली झाल्या त्याचा मला पत्ता लागू शकलेला नाही.

## प्रदूषणाचा मागोवा

पाण्यातून लेड पॉयझनिंग होत नाही हे नक्की झाल्यानतर व हवेतून होत आहे असं वाटत असल्यामुळं याबाबतीत निश्चित अनुमान कस बांधता येईल याचा विचार करत असताना मला असं वाटल की, छताचे पत्रे, उंच कपाट वगैरेवर जी धूळ साठते ती वाऱ्याबरोबर हवेतून येणाऱ्या द्रव्याची निदर्शकच असणार. म्हणून जर पंख्यावर जमलेल्या धुळीचं पृथक्करण करून त्यातील शिशाचं प्रमाण काढून मिळालं तर हवेतून होणाऱ्या प्रदूषणाबाबत निश्चित काही माहिती मिळू शकेल. म्हणून पख्यावरील धूळ एका डबीत भरून ठेवली. त्या धुळीचे एनसीएलमधून पृथक्करण करून घ्यायचं ठरवल. त्याचप्रमाणे पाटील इस्टेट भागात नदीतील पाण-वनस्पतीमुळं खूप डास होत असल्यामुळं ओडोमॉसचा वापर भरपूर होतो. तेव्हा ओडोमॉसचही पृथक्करण करून घ्याव असं मनात आलं. त्या दोन्ही गोष्टी १२ नोव्हेंबर १९८१ रोजी एनसीएलमध्ये पोचवल्या. त्याबद्दल नोव्हेंबरअखेरीला फोन केला तेव्हा धुळीत १७१ पीपीएमइतकं शिसं आढळून आल. ओडोमॉसमध्ये मात्र शिस नाही अस सांगितल. याबाबतीत लेखी रिपोर्ट मात्र मिळेना म्हणून जानेवारी १९८२ अखेरीस आम्ही स्मरण-पत्र पाठवलं असता त्या पत्राला उत्तर म्हणून 'कार्यबाहुल्यामुळं तुम्ही दिलेल्या वस्तूंच पृथक्करण करून देणं शक्य नाही' अशा अर्थाचं पत्र आलं.

मध्यतरात पाटील इस्टेटमधील प्रदूषणाबद्दल ऐकून येथील लोकमान्य मेडिकल फौंडेशनच्या लोकानी या भागात सर्वेक्षण संशोधन करायचा विचार केला आणि इस्टेटमधील रहिवाशाची एक बैठक १३-१-८२ या दिवशी घेतली. पाटील इस्टेटमधील रहिवाशाच्या प्राथमिक आरोग्यतपासणीपासून या सर्वेक्षण संशोधनाची सुरुवात करावयाची असं ठरलं. त्याप्रमाणे ३१ जानेवारी १९८२ व ७ फेब्रुवारी १९८२ या दोन दिवशी मिळून एकूण सुमारे ७५ व्यक्तीची प्राथमिक आरोग्यतपासणी त्यांनी केली. यापैकी काहींच्या बाबतीत शिशाचं शरिरातील प्रमाण जास्त असण्याची शक्यता त्याना वाटली; परंतु याबाबतीत आवश्यक त्या तपासण्या करण्याची सुविधा त्यांच्याजवळ नसल्यानं व त्याना त्या सुविधा उपलब्ध होऊ न शकल्यानं त्यांच्या पहाणीचं काम अडल्यासारखं झाल.

याच सुमारास मला माझे मित्र डॉ. माधव कोल्हटकर यानी सुचविल्यावरून भाभा अॅटॉमिक रिसर्च सेंटरमधील डॉ. गणात्रा याना मी सर्व उपलब्ध तपशील कळविला. त्यानी माझं पत्र त्यांच्याकडील एअर मॉनिटरिंग विभागाकडे पाठविल आणि मला अपेक्षाही नसताना त्याचे दोन तज्ज्ञ एप्रिलमध्ये तपासणीसाठी येत आहेत अस मला कळवल गेलं.

सोनालीचं पुढील वर्ष हे १० वीचं वर्ष होतं आणि तिच्या अभ्यासाच्या तयारीच्या दृष्टीनं तिला पुण्याला आणण आवश्यक होतं. म्हणून फेब्रुवारी १९८२ मध्ये आम्ही मुलीना परत पुण्याला आणलं. अर्थात त्याना घेऊन पाटील इस्टेटवर राहणं अशक्यच होत. आम्ही सर्वच पर्वतीदर्शन भागात माझ्या मामीच्याकडे जाऊन राहिलो. याचा न कळत असा फायदा झाला की, बी. ए. आर. सी. चे तज्ज्ञ येणार त्या वेळी अनायासे सोनाली येथे असणार होती.

२२ एप्रिल १९८२ रोजी बी. ए. आर. सी. चे दोघे तज्ज्ञ येथे आले. लोकमान्य मेडिकल फौंडेशनचे डॉ. वैद्य व डॉ नाईक हेही मुद्दाम हजर राहिले. फौंडेशनने प्राथमिक तपासणी केलेल्या ७५ व्यक्तींपैकी ज्यांच्या बाबतीत शिशाच प्रमाण जास्त असण्याची शक्यता वाटत होती त्यांच्यापैकी

१४ व्यक्तींचं रक्त बी. ए. आर. सी. च्या तज्ज्ञांनी घेतलं व पाटील इस्टेटच्या रस्त्याच्या बाजूला आणि नदीच्या बाजूला सकाळी व संध्याकाळी २–२ तास सक्शन पंपानं हवा गोळा करून त्यातील घटकांचे थर फिल्टरपेपरवर घेतले. ते या सर्वांचं पृथक्करण करून १४ व्यक्तींच्या रक्तांतील शिशाचं प्रमाण व हवेतील शिशाचं प्रमाण याबद्दल कळविणार होते. हवेतील शिशाबरोबर सापडणाऱ्या इतर द्रव्यावरून शिशाचा संभाव्य उद्भव कोणत्या प्रकारच्या उद्योगांतून होत असावा हेही ते कळविणार होते. कोणा लहान मुलांचे दात पडल्यास तेही पाठवा. त्यावरून शरिरातील शिशाबाबत अधिक विश्वासार्ह अनुमान मिळू शकेल असेही त्यांनी सांगितलं होतं. त्याप्रमाणे त्यांना एक दातही पुढे आम्ही पाठविला. आता या घटनेला १५–१६ महिने होऊन गेले. आजतागायत स्मरणपत्रे पाठवूनही काहीही रिपोर्ट मिळालेला नाही !


□

सोनालीच्या अनोख्या दुखण्यातून जाणवलेल्या प्रदूषणाच्या प्रश्नांचा मागोवा घेण्याचा प्रयत्न या ठिकाणी थांबलेला आहे. १९७८ सालापासून सुमारे पाच वर्ष, वेळप्रसंगी व्यवसायाकडे काहीसं दुर्लक्ष करूनही या दुखण्याचा आणि प्रदूषणाचा मागोवा घेण्यात घालवावी लागली आहेत. यात वेळ व पैसा खूपच खर्च झाला आहे. शिवाय जवळजवळ संपूर्ण १९८२ साल आम्ही आमच्या नातेवाइकांना त्रास देत एक प्रकारे निर्वासितासारखं काढलं आहे. आता काहीशी स्थिर स्वरूपाची अशी गावात रहाण्याची व्यवस्था करून आम्ही आमच्यापुरता हा प्रश्न सोडविला आहे. सोनालीचं दुखणं जवळजवळ संपलं आहे. तिला आम्ही संपूर्णतः होमिओपाथिक औषधोपचार केले आहेत. लेड पॉयझनिंगवरील अगदी आधुनिक प्रचलित औषध म्हणजे 'पेनिसिलामाइन' माझी बहीण डॉ. सुधा गोगटे हिनं प्रयत्नपूर्वक अमेरिकेतून व दुसरी बहीण डॉ. सरोज सहस्रबुद्धे हिनं इंग्लंडमधून हे औषध उपलब्ध करून दिलं आहे. परंतु या दोन्ही बाटल्या न वापरता तशाच ठेवून दिल्या आहेत. एक तर हे औषध अत्यंत काळजीपूर्वक द्यावं लागतं व त्याचा वापर केलेले आमच्या माहितीत कोणी डॉक्टर्स नाहीत आणि दुसरं कारण म्हणजे होमिओपाथिक औषधांचा सोनालीला चांगला उपयोग झाला आहे. तिला प्लंबम्‌चा एक एम्‌चा एक डोस दिल्यावर तिच्या रक्तातील शिशाचं प्रमाण ४० मा. ग्रा. नं घटलेलं आढळून आलं. त्यानंतर परत त्या प्रकारच्या तपासण्या करून मिळणं एन सी एल मधील 'कार्यबाहुल्या'मुळं शक्य झालेलं नाही. तथापि तिला जेव्हा जेव्हा त्रास होतो तेव्हा तेव्हा आम्ही होमिओपाथिक औषधंच दिली आहेत आणि आता तिचा त्रास जवळजवळ संपूर्ण संपला आहे.


मोतियाच्या मळमळण्याच्या व पोट दुखण्याच्या तक्रारी पूर्णपणे थांबल्या आहेत. शुभदाच्या चेहऱ्यावरील तपकिरी डाग नाहीसे झाले आहेत. पाटील इस्टेट भागातून दूर गेल्यावर तिघींच्याही प्रकृतीत सुधारणा झाली हाही पाटील इस्टेट भागातील प्रदूषणाचाच पुरावा नाही का ?

या ४–५ वर्षांच्या काळात डॉ. सोनूमामा तळवलकरांच्या अचूक औषधयोजनेमुळे सोनालीच्या दुखण्यावर मात करता आली. डॉ. आठवले, डॉ. परांजपे यांनी निदानाचा पाठपुरावा करायला बहुमोल मदत केली. तथापि या काळात अनेक डॉक्टर्स–विशेषतः अॅलोपॅथिक डॉक्टर्स– हे किती अशास्त्रीय वृत्ती बाळगून असतात हेही जाणवलं. अनेकांना हे दुखणं लेड पॉयझनिंगचं असेल हेच पटत नव्हतं आणि त्याचं कारण होतं 'आपल्याकडे लेड पॉयझनिंग होतंच कुठे !' दुसरं कारण म्हणजे त्यांचा होमिओपाथीवर विश्वास नसतो. त्यामुळं त्यांच्या ख्याली सोनालीचं दुखणं औषधाविनाच बरं झाले म्हणजे ते मानसिकच असलं पाहिजे. तसं अनेकांनी सूचितही केलं. मुंबईच्या एका प्रसिद्ध बालरोगतज्ज्ञानं तर एन सी एल मधील शास्त्रज्ञाला माणसाच्या रक्ताचं पृथक्करण करण्याची सवय कोठे असणार अशी शंका व्यक्त करून अॅटॉमिक अब्सॉर्पशन फोटो स्पेक्ट्रोमिटरसारख्या अत्याधुनिक उपकरणातून मिळालेलं पृथक्करण विश्वासार्ह मानलं नाही ! आणि म्हणून त्यांनी दुसरी कोणती पद्धत सुचवली नाही किंवा इतर कोणत्या प्रयोगशाळेतून पृथक्करण करून घेण्याबद्दल सांगितलं नाही. काहींनी १०० मा. ग्रा / १०० सी सी हे शिशाचं रक्तातील प्रमाण काही जास्त नाही असंही सांगितलं ! या मंडळींवर विसंबलो असतो तर सोनालीचं काय झालं असतं कोणास ठाऊक !

त्याचप्रमाणे आपल्याकडल्या राष्ट्रीय दर्जाच्या ज्या संशोधनसंस्था आहेत तेथील शास्त्रज्ञांना तरी प्रदूषणासारख्या समस्यांबाबत मदत करण्याची मुभा असायला हवी. त्यांना अशा बाबतीत मदत करणं म्हणजे नसत्या भानगडीत पडणं, नसती कटकट ओढावून घेणं, कारण नसताना भलत्याच प्रश्नात संस्थेला गुंतवणं आहे असं वाटणार नाही असं वातावरण असणं आवश्यक आहे. तसं झालं तरच कित्येक ठिकाणी निर्माण होणाऱ्या प्रदूषणांना वेळेवरच रोखणं शक्य होईल.



वनसंपत्तीत भर घालण्यासाठी ' किरकोळ ' जंगलं साफ करून त्यांचं ' मल्यवान ' जंगलात परिवर्तन करण्याच्या अनेक योजना राज्याराज्यातील वन-विकास महामंडळे राबवीत आहेत. कल्पना चांगलीच आहे; पण 'मूल्यवान' की ' किरकोळ '–ठरवणार कोण ? सामाजिक कार्यकर्ते आणि पर्यावरणवाद्यांच्या आक्षेपांना उत्तर देण्याचा प्रयत्न एक तज्ज्ञ वन-अधिकारी करत आहेत.



●


दु. अ. मरबल्ली
मुख्य वनसंरक्षक (विशेष)
महाराष्ट्र राज्य, पुणे


# वनविकास आणि पर्यावरणसमस्या

⊟

अलीकडे लोकसंख्येत बेसुमार वाढ झाल्यामुळे वनोपजांच्या दैनंदिन गरजा सातत्याने व झपाट्याने वाढत आहेत. त्यामुळे मुळातच अपुऱ्या असलेल्या जंगलावर चोहोबाजूंनी सतत आघात होत आहेत. वृक्षाराजींचे प्रमाण कमी होत असल्यामुळे त्याचे दुष्परिणाम आपण भोगतोच आहोत. काही ठिकाणी अनिश्चित, अपुरा व लहरी पाऊस तर काही ठिकाणी अतिवृष्टीमुळे येणाऱ्या पुरांना थोपविण्यास पुरेसा वृक्षासमूहाचा अभाव व परिणामी शेती व प्राणिमात्राच्या जीवितहानीचे होणारे अपरिमित नुकसान, जमिनीची द्रुतगतीने होणारी धूप, धरणे व जलाशयांत गाळ साठून त्यांच्या कार्यक्षमतेवर होणारा विपरीत परिणाम ही निसर्गसंतुलन ढळत असल्याची काही ठळक उदाहरणे. अपुऱ्या वृक्षाच्छादित क्षेत्रामुळे निसर्गाचा समतोल बिघडून पर्यावरणविषयक अनेक जटिल समस्या आज आपणाला भेडसावत आहेत. या अनुभवाच्या पार्श्वभूमीवर शासनाच्या वीस कलमी कार्यक्रमांतर्गत वृक्षारोपणास दिलेले अनन्यसाधारण महत्त्व कालोचितच आहे.

राष्ट्रीय वननीतीनुसार वृक्षाच्छादित वनक्षेत्राचे प्रमाण एकूण भूभागाच्या ३३ टक्के असावयास हवे असे तज्ज्ञांचे मत आहे. निसर्गसंतुलन तसेच वनविषयक समाजाच्या वाढत्या गरजा भागविण्यासाठी एकूण भौगोलिक क्षेत्राच्या तिसरा हिस्सा वृक्षाराजीखाली असणे अगत्याचे आहे. या दृष्टीने महाराष्ट्राची परिस्थिती काहीशी असमाधानकारक आहे. महाराष्ट्रातील वनक्षेत्राचे प्रमाण २१ टक्के आहे. अर्थात, पुरेसे वृक्षाच्छादित क्षेत्र केवळ १२ टक्के एवढच आहे. सद्य:परिस्थितीत जंगलजमिनीत वाढ करणे केवळ अशक्यच आहे. तेव्हा राष्ट्रीय वननीतीचा इष्टांक साध्य करण्याच्या दृष्टीने खाजगी जमिनीत, पडीक क्षेत्रात, शेताच्या बांधावर, शाळा, महाविद्यालये, रुग्णालये, कचेऱ्या, कारखाने इत्यादींच्या परिसरात, रस्ते, रेल्वेमार्ग, कालवे वगैरेंच्या दुतर्फा, पंचायत जमिनीवर इत्यादी अनेक ठिकाणी सातत्याने व अथक प्रयत्न करून वृक्षारोपणाची मोहीम घेणे इष्ट ठरते. अशा प्रकारच्या वृक्षारोपणास ' सामाजिक वनीकरण ' ही संज्ञा आहे. या कामाचा प्रचंड व्याप व राष्ट्रीय महत्त्व ओळखून महाराष्ट्र शासनाने एक स्वतंत्र सामाजिक वनीवकरण विभाग स्थापन केला आहे.

## वनविकासाचे धोरण आणि दिशा

वने ही राष्ट्रीय संपत्ती असून त्यांचे योग्य प्रकारे शास्त्रीय नियोजन व संरक्षण केल्यास त्यांची पुनर्निमिती होऊन भावी पिढ्यांना अव्याहतपणे त्याचा लाभ होऊ शकतो. विशिष्ट जंगलातील झाडांची एकूण सरासरी वार्षिक वाढ लक्षात घेऊन त्या प्रमाणात परिपक्व झाडांची तोड नियंत्रित करण्याचे धोरण ठेवले जाते. दुसऱ्या शब्दांत सांगावयाचे म्हणजे मुद्दल सुरक्षित ठेवून

केवळ वार्षिक व्याजाएवढीच किंवा वाढीएवढीच तोड सीमित करण्यात येते. याचे प्रधान उद्दिष्ट म्हणजे वृक्षराजी अव्याहतपणे टिकू शकते. तसेच वृक्षतोड करताना परिसर-शास्त्रातील सर्वसाधारण तत्त्वप्रणालीही पाळली जाते. याची उदाहरणे म्हणजे जलाशयांच्या महत्त्वाच्या पाणलोटक्षेत्रात तसेच अतिउताराच्या जंगलक्षेत्रात वृक्षतोड पूर्णतः प्रतिबंधित करणे; निसर्गसंरक्षणाकरिता व विशेषकरून वन्य प्राणिसंरक्षणाकरिता विशिष्ट वनक्षेत्र राष्ट्रीय उद्यान किंवा अभयारण्य म्हणून घोषित करणे वगैरे

स्थानिक लोकांच्या वनोपजाच्या गरजा लक्षात घेऊन तसेच वनजमिनीची उत्पादनक्षमता अधिक असेल तर स्थानिक गरजांव्यतिरिक्त वनाधारित उद्योगधंद्याच्या व शासनाच्या विविध विकास योजनांना लागणाऱ्या वनोपजाची गरज लक्षात घेऊन वनकार्यआयोजनेमध्ये त्या वनक्षेत्रासाठी सुयोग्य वनव्यवस्थापनपद्धती अवलंबिण्याची रूपरेषा दिली जाते. जेथे जेथे वनाची योग्य वनव्यवस्थापनेनुसार देखभाल केली जाते तेथे तेथे वृक्षजातीची नैसर्गिक पुनरुत्पत्ती होऊन तसेच नियंत्रित तोडीमुळे वनसंपत्ती अव्याहतपणे सुस्थितीत राहू शकते.

## वनविकासातील अडचणी

वनविकास करावयाचा म्हणजे मोठ्या प्रमाणावर वनीकरणाची कामे हाती घेतली पाहिजेत. लागवडक्षेत्राचे गुराढोराच्या चराईपासून ५ ते १० वर्षे संरक्षण करणे अत्यावश्यक असते. चराईसाठी खुल्या वनक्षेत्रातसुद्धा गुराची संख्या त्या क्षेत्राच्या चराई-क्षमतेनुसार मर्यादित ठेवणे, तसेच चराई क्षेत्राचे विभाग पाडून त्यात क्रमशः चराई करणे (Rotational grazing) आवश्यक आहे. अन्यथा अतिरिक्त आणि अनियंत्रित चराईमुळे वनक्षेत्र अधिकाधिक निकृष्ट होऊन अल्पावधीतच उजाड होते. भाकड व निकृष्ट जनावराची संख्या कमी करणे, संकरित व चांगल्या जातीची मर्यादित जनावरे ठेवून कापीव गवत त्याना गोठ्यात घालणे (Stall feeding) इत्यादी मार्गांनी वनविकासातील अडसर काही प्रमाणात दूर होऊन गुरे पाळणाऱ्यांनाही अधिक उत्पन्न मिळू शकेल.

वनक्षेत्रातील अतिक्रमणे; चोरटी तूट, वनक्षेत्राना हेतुतः वा निष्काळजीपणे लावण्यात येणाऱ्या आगी यामुळे वनोपजाचे तसेच वनक्षेत्राचे अपरिमित नुकसान होत असते. या विघातक बाबीपासून जंगलाचे संरक्षण करणे अत्यावश्यक आहे. वन ही उघडी तिजोरी आहे व त्याचे अबाधित अस्तित्व जनतेच्या हार्दिक सहकार्यावरच अवलंबून आहे. त्यामुळे त्याना जंगलाचे महत्त्व पटवून जंगलसंरक्षणात त्यांचा कार्यक्षम सहभाग मिळविणे ही यशस्वी वनीकरणाची गुरुकिल्ली आहे.

वनक्षेत्रात रहाणारे लोक मुख्यतः आदिवासी असून आर्थिकदृष्ट्या मागासलेले व बहुधा दारिद्र्यरेषेखाली जीवन व्यतीत करणारे आहेत. या उपेक्षित विभागाचा सर्वांगीण व संतुलित विकास करून तेथील जनतेला पर्यायी रोजगार किंवा व्यवसाय उपलब्ध करून दिल्याशिवाय जंगलाचे यथायोग्य संरक्षण व संवर्धन होणे असंभवनीय आहे. एकूण वनसंरक्षणाचा यक्षप्रश्न केवळ शासनाच्या विधिनियमाच्या चौकटीत बसवून केवळ शासनाच्या प्रयत्नांनी सुटणार नसून तो वनक्षेत्रनिवासी जनतेच्या सामाजिक, शैक्षणिक आणि आर्थिक विकासाशी निगडित आहे.

वनव्यवस्थापनेच्या पारंपारिक पद्धती पर्यावरणसंरक्षणाच्या दृष्टिकोनातून अधिक योग्य वाटत असल्या तरी बेसुमार जंगलचराई, मानवनिर्मित आगी व चोरट्या तुटीमुळे विविध वृक्षजातीची नैसर्गिक पुनरुत्पत्ती योग्य प्रमाणात होत नाही व त्यामुळे वृक्षतोडीनंतर जंगलाची समाधानकारक पुनर्निर्मिती होणे अशक्यप्राय झाले आहे. यामुळे मानवनिर्मित रोपवनांचा जास्तीत जास्त अवलंब करणे अपरिहार्य झाले आहे; पण याकरिता पुष्कळ भांडवल गुंतविणे आवश्यक असते.

राष्ट्रीय कृषि आयोगाने अशी शिफारस केली आहे की, ज्या ठिकाणी जमिनीची उत्पादनक्षमता अधिक आहे, पण जेथे निकृष्ट प्रतीचे जंगल आहे तेथे क्रमाक्रमाने जंगलतोड करून (जनतेच्या दैनंदिन गरजा पुरविण्याकरिता), योग्य भांडवल गुंतवून, जलद वाढणाऱ्या मौल्यवान वृक्षांची लागवड करून मानवनिर्मित रोपवने तयार करणे आवश्यक आहे, जेणेकरून स्थानिक जनतेच्या तसेच साऱ्या राष्ट्राच्या वनोपजाच्या गरजा कमीत कमी काळात जास्तीत जास्त प्रमाणात पुरवता येतील. हे काम स्वायत्त वनविकास महामंडळाकडे सोपवावे, जेणेकरून शासनाच्या अर्थसंकल्पाला धक्का न लावता बँकेकडून परस्पर कर्ज काढून रोपवनाच्या कामास लागणारे भांडवल उभे करणे शक्य होईल. महाराष्ट्रात वनविकास महामंडळाची स्थापना १९७४ साली करण्यात आली असून त्याचे रोपवने तयार करण्याचे काम चालू आहे.

## काही पर्यावरण-समस्या

नाशिक येथील काही प्राध्यापकमंडळीचा असा दावा आहे की, वनविकास महामंडळाच्या जंगलतोडीमुळे तेथील निसर्गाचा समतोल बिघडत चालला आहे तसेच मोठ्या प्रमाणावर रोपवने निर्माण केल्यामुळे त्याची परिणती एकजाती जंगल (Monculture) मध्ये होते, जेणेकरून पर्यावरणावर दुष्परिणाम होणे शक्य आहे. हे विचार अत्यंत महत्त्वाचे असून त्याचा शास्त्रीय दृष्टिकोनातून व वस्तुनिष्ठ परिस्थितीच्या संदर्भात सखोल अभ्यास करणे इष्ट होईल.

वनविकास महामंडळाच्या नाशिक प्रकल्पाचे काम १९७४ पासून पेठ तालुक्यात चालू आहे पेठ तालुक्याचे एकूण जंगलक्षेत्र ४५,७०० हेक्टर असून त्यापैकी २७,४८० हेक्टर जंगल वनविकास महामंडळाकडे सुपूर्त केले आहे. या वनप्रकल्पाद्वारे दरवर्षी ६०० हेक्टर क्षेत्रात तोड करून वनरोपण केले जाते. पेठ तालुक्यातील वनक्षेत्राच्या तुलनेने हे रोपवनाचे क्षेत्र १.३ टक्के होत असून तेथील एकूण जमिनीच्या केवळ ०.६४ टक्के इतकेच आहे. स्थानिक जनतेच्या गुरांच्या चराईच्या गरजा व सोई लक्षात घेऊन व तोडीच्या केंद्रीकरणामुळे निसर्गावर होणारे दुष्परिणाम टाळण्यासाठी दरवर्षीच्या वृक्षतोडीचे क्षेत्र सहा निरनिराळ्या पोटकेंद्रावर वाटून दिले आहे. तसेच पर्यावरणाच्या रक्षणासाठी नाला व ओढ्याच्या काठांवर, जास्त चढउतार असलेल्या जमिनीवर, डोंगरमाथ्यावर व प्रत्येक कूप व सबकूपच्या सीमेवर अस्तित्वात असलेल्या

संमिश्र जंगलाचे पट्टे राखून ठेवण्याची दक्षता घेतली जाते. तसेच तोडीच्या कुपात उभे असलेले मोहवा, चार, अळीव, आवळा व तत्सम जंगली फळझाडे आदिवासी बाधवाच्या उपयोगाकरिता राखून ठेवली जातात. याप्रमाणे सीमांकित केलेल्या एकूण क्षेत्राचे ३० टक्के ते ४५ टक्के अस्तित्वात असलेले समिश्र जंगल राखून ठेवले जाते व उर्वरित क्षेत्रात तोड करून वृक्षांची लागवड केली जाते.

सागवान हा जलदगतीने वाढणारा व मौल्यवान इमारती लाकूड देणारा अत्यंत महत्त्वाचा वृक्ष असून त्याच्या लागवडीस प्राधान्य दिले जाते. तथापि खैर, शिवण, वेळू, मोहा वगैरे अन्य जातीच्या वृक्षाची पण काही प्रमाणात लागवड केली जाते. तसेच जेथे प्रतिहेक्टरी २०० झाडे तोडली जातात तेथे पावसाळयाच्या सुरुवातीसच प्रतिहेक्टरी २,५०० रोपाची लागवड केली जाते व मेलेल्या रोपाचे ठिकाणी सातत्याने लागवडीपासून तीन वर्षांपर्यंत पुन्हा रोपण केले जाते. अशा प्रकारे एका वृक्षाच्या तोडीच्या मोबदल्यात १२ मौल्यवान रोपांची लागवड केली जाते. रोपवनाच्या मूल्यमापनाच्या निकषाप्रमाणे ६० टक्के रोपे जिवंत राहिल्यास ते रोपवन यशस्वी मानले जाते. या संदर्भात नाशिक प्रकल्पातील रोपवनात सरासरी ६७ टक्के ते ९० टक्के जिवंत रोपे आढळून येतात व तीसुद्धा रोपांना कुंपण किंवा पाणी न घालता. यशस्वी लागवडीकरिता गुरे व शेळयामेंढ्यापासून तसेच वणव्यापासून रोपवनांचे काटेकोरपणे संरक्षण करावे लागते. तसेच जमिनीची धूप प्रतिबंधित करण्यासाठी ओढचा–नाल्यांना छोटे छोटे बांध घालणे, रस्त्याच्या कडेने व वरच्या भागात पाणी वाहण्याकरिता चर खोदणे, मोरी बांधणे वगैरे मृद व जलसंधारण तंत्राचाही उपयोग केला जातो.

वर नमूद केलेल्या विविध उपाययोजनांमुळे जमिनीतील माती व ओलावा टिकविण्यास मदत होते व जगलतोडीमुळे तात्पुरता बिघडलेला पर्यावरणाचा समतोल मूळ पदावर आणण्याकरिता किंबहुना कालांतराने त्याच्यात सुधारणा घडवून आणण्यात खचितच मदत होते.

- वनविकास महामंडळाच्या वृक्षतोडीमुळे होणाऱ्या व त्याच परिक्षेत्रात डोंगरउतारावरील निकृष्ट मालकी जमिनीत करण्यात येत असलेल्या शेतीमुळे होणाऱ्या दूरगामी परिणामांचे तुलनात्मक विवेचन करणे अप्रस्तुत होणार नाही वनप्रकल्पाद्वारे दरवर्षी पेठ तालुक्यातील एकूण जमिनीच्या फक्त ०.६४ टक्के जमिनीवर जगलतोड केली जाते व त्याच जमिनीतील रोपवनातील झाडे परिपक्व झाल्यावर ६० वर्षांच्या दीर्घ कालावधीनंतर परत तोड करण्यात येईल. जंगलतोडीनंतर जमिनीवर उभ्या असलेल्या बुडामुळे व पहिल्या पावसाळ्यानंतर उगवणाऱ्या विपुल गवत व झाडीझुडुपामुळे तसेच वर नमूद केलेल्या मृदसधारण व पर्यावरण-रक्षणाच्या प्रभावी उपायामुळे उजाड जमिनीवर होणाऱ्या धुपेच्या तुलनेत येथील धूप पहिल्या वर्षीच ९० टक्के पर्यंत प्रतिबंधित होण्यास मदत होते. उलटपक्षी डोंगरउतारावरील शेतीच्या ठिकाणी जमीन उघडी रहात असून त्यात दरवर्षी किंवा दोन वर्षांनी शेतीकरिता जमीन उकरली जाते. अर्थात अशी जमीन ६० वर्षांच्या कालावधीत ३० ते ६० वेळा शेतीसाठी उकरली जाते, (याउलट वनविकास महामंडळाच्या तोडीच्या कुपात ६० वर्षांच्या कालावधीत जमीन एकदाच व तीही अल्प काळापुरतीच उघडी राहते.) जेणेकरून अशा डोंगरउतारावरील नागलीच्या शेतात जमिनीची धूप फार मोठ्या प्रमाणात होते. कालांतराने अशी जमीन ओस पडण्याची शक्यताही नाकारता येत नाही. अशा डोंगरउतारावरील शेतजमिनीचे प्रमाण पेठ तालुक्यातील एकूण जमिनीच्या ४५ टक्के व एकूण शेतीखालील जमिनीच्या जवळजवळ ८० टक्के आहे. याउलट वनविकास महामंडळाचे दरवर्षी तोडीचे क्षेत्र फक्त ०.६४ टक्के इतकेच आहे हे लक्षात घेणे आवश्यक आहे.

काही निसर्गप्रेमी महाभागाचे असे मत आहे की, वनविकास महामंडळाची वृक्षतोड म्हणजे प्रत्यक्ष भूमातेवर चाललेला बलात्कारच होय. जर बलात्कार होत आहे असे ग्राह्य धरले तर तो कुठे होत असेल हे निराळे सांगण्याची गरज नाही.

पर्यावरणाच्या रक्षणाकरिता योग्य उपाययोजना करीत असताना वनविकास महामंडळाच्या रोपवनांना 'मोनोकल्चर' असे काहीसे धिक्कारयुक्त नामाभिधान देणारे काही वृक्षप्रेमी महाभाग मात्र लाखो हेक्टर जमीन शेतीखाली आणल्याबद्दल किंवा मोठ्या औद्योगिक शहराच्या वाढीच्या निमित्ताने सिमेंट–कॉंक्रीटची जगले उभी केल्याबद्दल विशेष सवेदनाशील दिसत नाहीत ही एक खेदाची गोष्ट होय.

सती अनसूयेला आपद्धर्म स्वीकारून विश्वकल्याणाकरिता गुरुदत्तात्रेयाला जन्म द्यावा लागला. त्याचप्रमाणे भूमातेला आपद्धर्म स्वीकारून (वनविकास महामंडळाच्या जंगलतोडीच्या स्वरूपात) लोककल्याणाकरिता लक्षावधी मौल्यवान व सुसंस्कारित बालतरूंना जन्म देणे (रोपनिर्मिती) अपरिहार्य झाले आहे आणि ती एक काळाची गरज आहे.

## स्टॉकहोम पर्यावरण परिषद


१९७२ साली स्टॉकहोम येथे संयुक्त राष्ट्रसघाच्या विद्यमाने पर्यावरणविषयक विचारविनिमय करण्याकरिता आयोजित केलेल्या परिषदेनंतर आपल्या देशातील निसर्गप्रेमी तरुण मडळी पर्यावरणसमस्याविषयी 'विशेष संवेदनाशील, जागरूक व क्रियाशील झालेली आहेत भावी पिढीच्या व एकदरीत देशाच्या दृष्टीने ही एक आशादायी, आनंदाची व समाधानाची गोष्ट होय.

ईशोपनिषदामध्ये पर्यावरणाविषयी खालील अत्यत महत्त्वाचे विचार आपल्या पूर्वजानी माडलेले आहेत :

'विश्वाची निर्मिती हे अनत शक्तीचे कार्य असून त्याचा उपभोग साऱ्या चराचरानी घ्यावा. प्रत्येक वर्गाने आपण विश्वाचा एक अविभाज्य घटक मानून दुसऱ्या वर्गाशी आत्मीयतेने व सामाइकपणे विश्वातून मिळणाऱ्या आनदाचा आस्वाद घ्यावा. कोणत्याही एका वर्गाने किंवा व्यक्तीने दुसऱ्याच्या हक्कावर अतिक्रमण करू नये!'

ज्या काळात जंगले, वन्यप्राणी, इतर नैसर्गिक सपत्ती मुबलक होती, त्या काळातदेखील सृष्टीतील सारे चराचर एकमेकावर अवलंबून आहे ही जाणीव आपल्या पूर्वजाना होती हे सिद्ध होत आहे व ईशोपनिषदातील या अमर विचारामुळे आजचा तरुणवर्ग प्रभावित होवो व मानवजातीच्या हिताच्या अशा पर्यावरणरक्षणाच्या कार्यात त्याना स्फूर्ती व सुयश मिळो ही सदिच्छा.

सांगली-साताऱ्याच्या सीमेवरील मायनी
तलावावर उद्दाम शिकारी बेगुमानपणे
पाखरं टिपीत होते.
कुठल्याही तलावावर दिसणारं हे सर्वसाधारण
दृश्य.
पण जागरूक निसर्गप्रेमी-गावकरी व
वन-कर्मचारी यांच्या दक्षतेमुळे शिकारीच
जाळ्यात गवसले त्याची अनुकरणीय
हकीकत...



●

जय सामंत, 'निसर्गमित्र', कोल्हापूर

# मायनी तलाव पक्षी अभयारण्य : यशस्वी उपक्रम

मायनी तलाव तसा साधाच असा पण एक बंधाऱ्यामुळे तयार झालेला जलाशय आहे. मायनी गावाच्या पूर्वेला २ किलोमीटर अंतरावर व कलेढोणला जाणाऱ्या रस्त्यालगत दक्षिणेस असणाऱ्या या तलावाचे पाणी गेले एक शतक गावच्या शेतीला व विहिरींना पाणी पुरवत आहे. मायनी गाव हे सातारा जिल्ह्यातील खटाव तालुक्यात असून सांगली व सातारा जिल्ह्याच्या सीमेवर वसले आहे. मायनी-जवळचे तसे मोठे गाव विटा. हे १८ किलोमीटर अंतरावर आहे. मायनीला जाण्यासाठी २ मार्ग आहेत. पुणे-बेंगलोर राजमार्गावर कऱ्हाड येथून विटामार्गे मायनीला जाता येते, तर दुसरा मार्ग सांगली-तासगाव-विटा मायनी असा आहे. दोन्ही रस्ते पक्के असल्याने मायनी तलावावर केव्हाही जाता येते. तसेच तलाव सडकेला लागून असल्याने फारसे चालावेही लागत नाही.

पावसाळ्यात पूर्ण भरल्यानंतर मायनी जलाशयाचा विस्तार १३५ एकर असून सध्या सरासरी खोली ५ फूट आहे. या तलावात ५ ओढे येऊन मिळतात. जलाशयाची निर्मिती इंग्रज अमदानीत इ. १८७२ साली करण्यात आली. मुळात तलावातील पाण्याची खोली १७ फूट होती अशी नोंद आढळते; पण गेल्या शतकात आसपास झालेल्या झाडतोडीमुळे व पुष्कळ जमीन शेतीखाली आल्यामुळे तलावाच्या पाणलोटक्षेत्रात मोठ्या प्रमाणात धूप होऊन तो गाळाने जवळजवळ १२ फूट भरून गेला आहे. ह्या गाळ भरण्याच्या प्रक्रियेमुळे तलाव जरी पाणी साठविण्यासाठी निरुपयोगी होत असला तरी त्यात झालेल्या विशिष्ट बदलामुळे जगातील विविध भागातील असंख्य दुर्मिळ व स्थलांतरित पक्षी इथे दरवर्षी भेट देतात. तसा हा परिसर पुष्कळसा कमी पावसाचा व दुष्काळीच असून इथे झाडोराही जवळजवळ नाहीच. त्यामुळे हा तलाव इतक्या पक्ष्यांना कसा आकर्षित करू शकतो हा अभ्यासाचा विषय आहे.

मायनी तलाव, तेथील स्थानिक व स्थलांतरित बदके यासाठी गेली अनेक वर्षे शिकारीलोकांमध्ये प्रसिद्ध आहे. पूर्वी संस्थानी कारकीर्दीत राजघराण्यातील लोक व त्यांचे युरोपियन व शाही पाहुणे बदकांच्या शिकारीसाठी अनेक तलावांवर जात. त्यात या गार्डे-मायनी, राजेवाडी इत्यादी तलावांचे खास स्थान होते. या बदक व इतर पाणथळ जागेत येणाऱ्या पक्ष्यांच्या शिकारीसाठी खास बनवून घेतलेली लहान तोफ ही कोल्हापूरच्या वस्तुसंग्रहालयात पहावयास मिळते. या तोफेतून एकाच वेळी असंख्य छरे उडविता येत असल्याने, पक्ष्यांच्या थव्यावर नेम धरून बार झाडताच शेकडो पक्ष्यांची एकाच वेळी शिकार होत असे. शिकार हा 'शौक' म्हणूनच पाहिला जात असल्याने कमीत कमी वेळात जास्तीत जास्त पक्ष्यांची हत्या करण्यावर भर असे.

मायनी येथील पक्ष्यांचे निरीक्षण, अभ्यास व छायाचित्रण करण्यासाठी कोल्हापूरच्या निसर्गमित्रमंडळाने मागील वर्षी दिवाळीच्या सुट्टीत तलावाला भेट दिली. रात्री विटा येथे विश्रामगृहात मुक्काम करून सकाळी ७ च्या सुमारास आम्ही मायनीला निघालो. मायनी तलाव पक्क्या सडकेला लागूनच असल्याने

आम्ही सरळ तलावाजवळच पोहोचलो. तलावावर जाताच आम्हाला सर्वप्रथम दर्शन दिले ते ३० रोहित पक्ष्याच्या थव्यानेच. हा थवा पाण्याच्या पृष्ठभागापासून ४० फूट अंतरावर राहून तलावाला प्रदक्षिणा घालत होता. त्याच्यापाठोपाठ अनेक जातीच्या बदकाचे थवे पण घिरट्या घालत होते.

सर्व सभासद आपापल्या दुर्बिणीतून विविध पक्षीजाती ओळखण्यात दंग असतानाच कॅमेरावाले सभासद जवळून उडणाऱ्या पक्ष्यांच्या रंगीत पारदर्शिका घेण्याच्या गडबडीत होते. इतक्यात एक विपरीत घडले. दिवाळीला अजून खूप दिवस असूनसुद्धा फटाक्यांचा धडाका उडाल्याचा आवाज आम्हाला ऐकू आला व नुकतेच पाण्यावर स्थिर होणारे पक्ष्याचे कळप आवाजाला बुजून पुन्हा चारी बाजूस उडू लागले. आम्हीही गोंधळून गेलो होतो. छायाचित्रकार फोटोची चांगली संधी हुकली म्हणून हळहळत होते. संपूर्ण तलावावर शेकडो पक्षी गोंधळलेल्या अवस्थेत फडफडत होते व तलावावर पक्ष्याचे मोठे कळप घिरट्या घालत होते. ही परिस्थिती अर्धा तास टिकली आणि जेव्हा पक्षी पुन्हा पाण्यावर स्थिर होऊ लागले तेव्हा फटाक्यांची दुसरी फैर उडाली आणि पक्ष्यांची पुन्हा कलकलाट करत गोंधळाची पळापळ सुरू झाली.

आता आम्हाला परिस्थितीची कल्पना आली होती. दुर्बिणीने तलावाच्या सभोवतालच्या काठचे निरीक्षण केल्यावर संपूर्ण किनाऱ्याच्या परिसरात विरुद्ध दिशांना २–३ माणसे उभी असलेली दिसली व थोड्या वेळाने ती माणसे पक्ष्याना बुजविण्यासाठी मोठे फटाके व बाण पेटवीत असलेली दिसली जास्त काळजीपूर्वक सर्व परिस्थितीचे अवलोकन केल्यावर जुन्या पद्धतीचा, पक्ष्याच्या राजेशाही शिकारीचा हा प्रकार असल्याची जाणीव झाली. उघडपणे एवढ्या मोठ्या प्रमाणात चाललेल्या बेकायदेशीर शिकारीचा हा प्रकार पाहिल्यावर धक्काच बसला !

## शिकार चालूच होती

सर्व प्रकारची खात्री करण्यासाठी तीन गट करून माणसाना आम्ही वेगवेगळ्या दिशेने तलावाला चक्कर मारण्यास सांगितले. मिळालेली माहिती अतिशय महत्त्वाची व उद्वेगजनक असल्याचे दिसून आले तलावाच्या ज्या बाजूला भिंत आहे व पाणी अडविण्यासाठी दगडी बांध आहे, या घोड्याच्या नालाच्या आकाराच्या बांधावर राहून एक माणूस हवेत फटाके लावलेले बाण सोडत होता व त्या बाजूला शेतीत वेगवेगळे करकोचे किंवा कोणत्याही जातीची बदके आली की त्याना पाण्यात उतरण्याआधी पुन्हा बुजवून परतवून लावत होता.

तलावाच्या दक्षिण बाजूलाही दुसरी माणसे फटाके लावून हीच कृती करून त्या बाजूला पण पक्ष्याना उतरू देत नव्हती. पूर्व बाजूने प्रमुख ओढा तलावात पाणी आणून सोडत असल्याने ही बाजू गाळाने भरलेली उथळ, दलदलीची व असंख्य लहान झुडपे असलेली होती. असा परिसर पक्ष्याना अन्न मिळविण्यासाठी व संरक्षणाच्या दृष्टीने उत्तम. या विस्तृत भागावर सर्व मोठे पक्षी व असंख्य बदके उतरण्याचा प्रयत्न करत व पुन्हा आवाजाचा धडाका उडे. अर्थात हा आवाज फटाक्यांचा नसून पक्ष्याचा कर्दनकाळ अशा बंदुकाचा होता. या झुडपाच्या आडोशाला खंदक खणून व संपूर्ण लपून बसून ४ ते ५ बंदुकधारी शिकारी एकमेकांपासून दूर अंतरावर बसून हे दमलेले व गोंधळलेले असहाय्य पक्षी जेव्हा खाली उतरण्याचा शिकस्तीचा प्रयत्न करत तेव्हा त्यांना सहज गोळ्याचा मारा करून खाली पाडत. मोठे करकोचे, रोहित वगैरे सथ उडणारे पक्षी अत्यंत सोपे लक्ष ठरे. पक्षी पाण्यात पडल्यास त्याला आणण्यासाठी हरकामे पण शिकाऱ्याजवळ होतेच. दुर्बिणीतून हा सर्व राजेशाही शिकारीचा खेळ पाहिल्यावर व त्याचे जास्त जवळून निरीक्षण करण्याचा प्रयत्न केल्यावर तलावाच्या काठाजवळ उभी केलेली जीप व आत टाकलेली पक्ष्याची कलेवरे पहावयास मिळाली. यात रोहित, चक्रवाक, नुक्टा नावाचे बदक, व्हिसलिंग टील, सैबेरिअन बदके, सॅंडग्रोव्ह्ज पक्षी, पांढऱ्या मानेचे करकोचे इत्यादी पक्षी दिसून आले.

शेजारच्या उत्तरेस असणाऱ्या माळावर बसलेल्या शिकाऱ्याने आम्हाला फोटो काढायला मिळावेत म्हणून कदाचित डोक्यावर हवेत तरंगणाऱ्या पक्ष्याची शिकारही करून दाखवली ! अशा या बेकायदेशीर घटनेची अनेक छायाचित्रे घेण्याची संधी कल्पना नसताना मिळाली.

वेळ सकाळची असल्याकारणाने रात्री आसपासच्या झाडावर रहाण्यासाठी गेलेले पाणथळ जागेतील पक्षी तलावावर परत गोळा झालेले होते. त्यातच रोहित पक्ष्याचा एक मोठा थवा, अदाजे ६०० पक्षी पाण्यावर उतरण्याचा धाडसी प्रयत्न करत होता. जेव्हा लांबून स्थलांतरित पक्षी येथे येतात तेव्हा ते थकलेले व भुकेलेले असल्याने प्रसंगी धोका पत्करूनसुद्धा पाणथळीवर उतरतात. ह्या थव्याने खाली चाललेला गोंधळ पाहिल्यावर व आवाज ऐकल्यावर कमी उंचीवरून तलावाभोवती ३–४ चकरा मारून तो दक्षिण दिशेला रवाना झाला. कदाचित जवळपासच्या दुसऱ्या एखाद्या तलावाकडे तो गेला असावा.

जास्त वेळ तलावावर रहाण्यात आता काही अर्थच नव्हता. शिकार चालूच होती हे बंदुकीचे आवाज ऐकल्यावर कळत होते. निर्भयपणे पाण्यात वावरणाऱ्या, विविध जातीच्या पक्ष्याचे फोटो घेण्याचे स्वप्न विरले असल्याने विमनस्क मनस्थितीत आम्ही परतलो. मायनीतील काही ग्रामस्थांनी आम्हाला दरवर्षी इथे मोठ्या प्रमाणात होणाऱ्या पक्षीहत्येची कल्पना दिली. तलावाच्या बांधावर भेटलेल्या शेतकऱ्याची प्रतिक्रिया अतिशय बोलकी होती.

'संस्थाने खालसा झाल्यावरसुद्धा अजून बदक मारायला सरकारमंडळी येतात... गावच्या लोकांना कामधंदा सोडून ह्या चैनी करायला वेळ कुठाय ? आणि पैसा कुठून आणायचा ? ह्या पक्ष्यानी आमचं काय घोडं मारलंय ?...मुकी बिचारी पाण्यात चरतात. आम्हाला त्यांचा त्रास नाही...... सांगलीकोल्हापूरची साहेबमाणस येऊन पक्ष्याच्या शिकारी करतात.

## वनखात्याने पाऊल उचलले

कोल्हापूरला परत येताच साताऱ्याचे विभागीय वनअधिकारी यांना सविस्तर निरोप पाठवून शिकारीच्या घटनेची कल्पना दिली व ताबडतोब पक्षीहत्या थांबविण्यासाठी कृती करण्याची कळकळीची विनंती केली. विविध स्थानिक वृत्तपत्रात ह्या घटनेबद्दल सचित्र माहिती प्रसिद्ध झाली. तेवढ्यात सरकारी यंत्रणेकडून ह्या घटनेची चौकशी

झाल्याचे वृत्तपत्रात वाचून आनंद झाला; पण जेव्हा २ गुराख्याना त्यांच्याकडे रोहित पक्ष्याचे कलेवर सापडले म्हणून पकडून ५० रु. दंड झाल्याचे वाचले तेव्हा साधार शंका आली. कारण बेकायदेशीर शिकारीच्या गुन्ह्यात बहुधा चोर सोडून सन्याशाचाच बळी जातो असा पूर्वानुभव. तेव्हा या वेळी सुद्धा याची पुनरावृत्ती होते की काय याची भीती होती. बहुसख्य चोरट्या शिकारीत मग ती प्राण्याची असो वा पक्ष्याची, सुस्थितीतील सधन व वजनदार लोकच उघड उघड कायदा मोडण्याचे धाडस करून आधुनिक हत्यारांनी प्राणीहत्या करतात. या सर्वांचा आळ मात्र मोठ्या प्रमाणात फासेपारधी किंवा स्थानिक सामान्य लोकांच्यावर घेतला जातो.

फासेपारधी, नदीवाले किंवा मागगारुडी या जमातीतील लोक पक्षी व प्राणी याची हत्या करायला कारणीभूत असतात हे न नाकारतासुद्धा असे म्हणता येईल की, त्याची शिकार ही पोटासाठी (subsistance) असून ती त्याच्या पूर्वापार चालत आलेल्या सस्कृतीचाच एक भाग आहे, पण जेव्हा सधन, सुशिक्षित व वरच्या थराचे लोक चैनीसाठी शिकार करतात तो निव्वळ छद म्हणून. त्याचे परिणाम माहीत असतानासुद्धा ! ह्या लोकांच्या समाजातील स्थानामुळे त्याच्या विरुद्ध गुन्हा शाबीत होऊन त्याना शिक्षा होणे अवघडच कारण आपल्या न्यायसस्थेलासुद्धा अजून वन्यजीवरक्षणाचे महत्त्व व त्याचे बदलते स्वरूप याचा अर्थ समजला नसावा अशी अनेकदा शंका किरकोळ शिक्षा पाहिल्या की येते.

पण या वेळी मायनीत वेगळाच अनुभव आला असे म्हणावे लागेल. वन्य प्राणी, पक्षी व निसर्गसरक्षण व सवर्धन करणाऱ्या कोल्हापूर, सागली, पुणे येथील सेवाभावी सस्थाच्या लहानमोठ्या प्रयत्नाची जाणीव वनविभागाला प्रयत्नपूर्वक करून दिली असल्याने व स्थानिक वनअधिकारी व अशा सस्था यामध्ये सशयाचे वातावरण न ठेवता शक्यतो सुसवाद राखल्याने, वनखात्याने अत्यंत जलद पावले उचलली व सुरुवातीच्या गुराख्याना पकडल्यानतर प्रत्यक्ष शिकार करणाऱ्या प्रतिष्ठित लोकानाच कायद्यात गोवले. यात सातान्याचे वनअधिकारी श्री. वाळके व श्री. शिकलगार याचा वाटा मोठा. अर्थात पहिल्यादा आवश्यक तो पुरावा दिल्यावर सबंधित शिकाऱ्यांवर कारवाई होऊन त्याना रु. २६०० दड झाला असे कळले. मुद्दा किती दंड झाला हा नसून प्रथमच उघड रीतीने होणाऱ्या बेकायदा शिकारीला बंदी घालणाऱ्या प्रयत्नाचा आहे.

कोल्हापूर व सांगली येथील सबधित निसर्गविषयक जागरूक सघटनांनी वनखात्याकडे मायनी तलाव 'पक्षी संरक्षित क्षेत्र' म्हणून प्रसिद्ध करावे व त्याच्यात योग्य त्या सुधारणा कराव्यात म्हणून जोर लावल्यावर आता मायनी तलाव संरक्षित म्हणून घोषित करण्यात आला आहे. या कामी मायनीतील स्थानिक कार्यकर्ते व सुबुद्ध नागरिक व या भागाचे आमदार यांचाही सहभाग मोलाचा ठरला. स्थानिक ग्रामस्थांनी स्वेच्छेने पक्षीप्रेमीच्या विनंतीला मान देऊन उन्हाळ्यात तलावातील पाणी शेतीसाठी कमी वापरावयाचे ठरविल्याने व शिकारीस बंदी झाल्याने या उथळ तलावात यंदा उशीरापर्यंत मोठ्या संख्येने स्थलांतरित पक्षी वास्तव्य करून होते.

मायनी तलाव पक्षी अभयारण्य करण्याच्या दृष्टीने अत्यंत योग्य आहे कारण सध्यासुद्धा असंख्य जातींचे स्थानिक व स्थलांतरित पक्षी त्याला भेट देतात या पक्ष्यांना संपूर्ण संरक्षण, त्याच्या येथील निवासासाठी व नैसर्गिक अन्नासाठी तलावात किरकोळ सुधारणा व अभयारण्यास भेट देण्यास येणाऱ्या निसर्गप्रेमींसाठी काही आवश्यक सोई केल्यास, अतिशय कमी खर्चात मायनी तलाव महाराष्ट्रातील 'भरतपूर' ठरल्यास आश्चर्य वाटू नये.

## चांगली सुरुवात

मायनी—परिसर अवर्षणप्रवण क्षेत्रात येतो. तलावाच्या आसपासची मातीसुद्धा मध्यम प्रतीची किंवा निकृष्ट आहे. तसा सर्व परिसर वृक्षहीन व बोडका असल्याने वनखात्याने तलावाच्या परिसरात झाडे लावण्याची मोहीम आखली आहे. मायनी—कलेढोण रस्त्याच्या दक्षिणेस वनखात्याच्या ताब्यातील ६५ हेक्टर एवढे क्षेत्र नियोजित पक्षी अभयारण्याच्या सुधारणेसाठी वापरण्याची योजना आहे. या सुधारणात प्रामुख्याने पडीक जमिनीवर मोठ्या प्रमाणात वृक्षारोपण, दलदलीत लहान बेटाची निर्मिती, पक्ष्याना आश्रयस्थाने म्हणून विविध जातीचे वृक्ष लावणे, पक्षी-निरीक्षणासाठी मनोरा व आडोसे इ. कामे हाती घेतली जातील. तलावापासून बाजूला रस्त्यापलीकडे प्रवासीनिवास, माहितीकेंद्र, प्रसाधनगृह व वनकर्मचाऱ्यासाठी निवासस्थाने याचे बांधकाम करायचे ठरले असून १९८७ पर्यंत सर्व कामे पुरी व्हावीत अशी अपेक्षा आहे. संपूर्ण कामाचा अंदाजे खर्च १६ लाख रु. अपेक्षित आहे.

मायनी तलावास सध्याच अंदाजे सव्वाशे जातीचे पक्षी भेट देतात त्यात रोहित, करकोचे, बदके, विविध बगळ्याच्या जातीचे पक्षी व इतर दलदलीतील व पाणवठ्यावरील पक्षीबांधव यांचा समावेश होतो काही वेळा समुद्र-किनाऱ्यावरचे पक्षी सुद्धा इतक्या लाबवर पहाण्यात आले आहेत.

या पक्षी अभयारण्याचा फायदा दुर्मिळ स्थलातरित पक्ष्याना अभय देण्यापुरताच मर्यादित नसून ह्यामुळे ग्रामीण भागातील जनतेला व खास करून विद्यार्थ्यांना निसर्गशिक्षणाचे व करमणुकीचे एक उत्तम साधन प्राप्त होणार आहे. या तलावात पक्ष्याना अभय मिळाल्याने त्याना प्रजनन करण्याची सधी मिळाल्यास वाढणारी पक्ष्याची सख्या आसपासच्या नेर, पिंगळी, येरळवाडी, राजेवाडी इत्यादी तलावांतही पसरेल. तसेच नवीन स्थलातरित पक्षी-जातीही या भागात आकर्षित होतील. अत्यंत कमी खर्चात हा अनत काळपासून चालत असलेला दुर्मिळ निसर्गठेवा आपण रक्षण करू शकू.

या अनुभवातून महत्त्वाचा उपस्थित होणारा मुद्दा असा की, पर्यावरण किंवा निसर्गरक्षण काम करताना विविध निसर्गप्रेमी व्यक्ती व सस्था यानी आशावादी दृष्टिकोन ठेवून शक्यतो सबंधित खात्याच्या लोकाशी सुसंवाद राखून काम केले तर अपेक्षित यश लवकर मिळण्याची शक्यता जास्त आहे. सरकारी कार्यपद्धती सुधारणे, अधिकारी—चाकोरीबाहेर जाऊन काम करणे किंवा स्वत: होऊन सर्वसामान्य लोकमत बदलेल याची वाट न पहाताच, निसर्गरक्षणाच्या समान उद्दिष्टासाठी आपण संबधित घटनाना वृत्तपत्रात प्रसिद्धी, लोकशिक्षण, प्रसगी सबधित खात्यावर दबाव, त्याना निवडक माहिती पुरविणे व कार्यसाफल्यासाठी सहकार्य देणे ही नीती आवश्यक ठरेल.

मायनीसारखी शेकडो तळी, पाझरतलाव, महाराष्ट्रात सर्वत्र पसरले आहेत. स्थानिक सहकार्य घेऊन सेवाभावी सस्था किमान तिथे येणाऱ्या स्थानिक व स्थलातरित पक्ष्याची हत्या थाबवू शकली तरी निसर्गरक्षणाच्या दृष्टाने चागली सुरुवात होत आहे असे म्हणावे लागेल.


वीस कलमांचा
हा आधार
कुटुंबाचा
मर्यादित विस्तार
davp 83/314

भारतासारख्या विकसनशील देशांनी कुठल्याही आयात करण्याच्या रसायनाचा पर्यावरणावर होणारा परिणाम तपासून मगच आयातीबाबत निर्णय घेतला पाहिजे. अन्यथा विकसित देशांनी टाकलेला घातुक कचरा गोळा करायची कचराकुंडी या पलिकडे अविकसित राष्ट्रांना किंमत उरणार नाही !

●

प्रा. सुरेश गजेन्द्रगडकर



# अविकसित राष्ट्रे विकसित राष्ट्रांचा आंतरराष्ट्रीय उकिरडा

अकरा वर्षांपूर्वी जेव्हा स्टॉकहोमला पर्यावरणाची जागतिक परिषद भरली होती तेव्हा विकसनशील राष्ट्रांना संशय होता की, आंतरराष्ट्रीय परिषदेमुळे आपला विकास थांबेल. प्रदूषणाचे नियम बंधनकारक ठरतील. म्हणून 'गरिबी हेच सर्वांत मोठे प्रदूषण आहे' असा नारा त्या देशांच्या प्रमुखांनी दिला व जनरल सेक्रेटरी टोल्बांना विकसनशील राष्ट्रांना दिलासा देण्यासाठी काही खास परिषदा भरवाव्या लागल्या आणि त्यानंतर विकास व प्रदूषण ह्यातील एक काही तरी मिळेल हा गैरसमज दूर होऊन प्रदूषणाविना पर्यावरणाचे प्रश्न दूर करून विकास साधता येतो हे स्पष्ट झाले व ह्याबाबत विकसित राष्ट्रांनी अविकसित राष्ट्रांविरुद्ध जणू संगनमत केले आहे असा पसरलेला गैरसमज हळूहळू दूर झाला आणि गेल्या काही वर्षात यू. एन्. ई. पी. ह्या पर्यावरणविषयक संस्थेने शास्त्र व तंत्रज्ञानाविषयी पुढाकार घेऊन उपयोजित तंत्राविषयी, तसेच पाणीपुरवठा व स्वच्छतेविषयी विशेष रस घेतला व हे मूलगामी खरे प्रश्न असल्याचे आपल्या लक्षात आल्याचे जाणवून दिले आहे.

परंतु दुर्दैवाने विकसनशील राष्ट्रांची गरिबी, परकीय चलनाची नितांत गरज, नोकरी-रोजगार ह्याची विवंचना व सर्वास कारण असलेली वाढती लोकसंख्या ह्याचे भांडवल करून विकसित राष्ट्रे त्यांच्यावर प्रदूषण लादताहेत असे अलीकडे लक्षात आले आहे.

धोकादायक, विषारी पदार्थांचे (वा टाकाऊ पदार्थांचे) विकसनशील राष्ट्रांत निर्यातीकरण करण्याचा एक प्रचंड धंदाच विकसित राष्ट्रांनी उघडलेला आहे. विकसित राष्ट्रांतील अनेक मोठ्या कंपन्यांचे हात ह्यात गुंतलेले आहेत. बहुराष्ट्रीय मोठी कॉर्पोरेशन्स, विकसित राष्ट्रांत केवळ त्याच्या सांडपाण्याची किंवा कचऱ्याची विल्हेवाट लावणे अशक्य असते किंवा ज्याचे अपशिष्ट अत्यंत घातुक, विषारी असते, अशा पदार्थांचे उत्पादन विकसित राष्ट्रांत करू देत नाहीत. त्यावर बंदी आहे. इतकेच नव्हे तर अशा उत्पादनानंतर जी घातुक अपशिष्टे आहेत, त्यांची योग्य प्रकारे विल्हेवाट लावण्याची (ती योग्य आहे हे सरकारने ठरवावे लागते) जबाबदारी त्या उत्पादकावर आहे. तसेच काही कीटकनाशकांचे उत्पादन जगातील बहुतेक विकसित राष्ट्रांनी त्यांच्या भीषणतेमुळे बंद केले आहे. तर ही अशी घातुक रसायनेही बनवण्याचे भले मोठे प्रचंड कारखाने विकसनशील देशात ह्या बहुराष्ट्रीय उत्पादकांनी घातले आहेत आणि ही विकसित राष्ट्रे अत्यंत निर्लज्जपणे हा जाणीवपूर्वक विकसनशील देशातील संहाराची बीजे पेरलेली पाहात आहेत.

अमेरिका ह्या बाबतीत अत्यंत संवेदनाक्षम देश होता. कार्टरच्या काळात १५ जानेवारी

१९८१ मध्ये घातुक भयानक पदार्थांच्या निर्यातीसंबंधीच्या एका कायद्याच्या बिलावर कार्टरने सही केली. त्यामुळे निर्यात करण्यात येणाऱ्या प्रत्येक पदार्थाविषयी माहिती विशेषत: अमेरिकेत त्यावर बंदी असल्यास त्याची माहिती (सकारण) आयात करणाऱ्या देशास देणे आवश्यक ठरत होते. कारण कित्येक विकसनशील राष्ट्रांना कुठल्या वस्तूंवर, कुठे, का बंदी आहे ह्याचे पूर्ण अज्ञान असते. तेव्हा त्यांना आयात करण्याआधी त्या पदार्थाचे भीषणत्व ज्ञात असावे ही कार्टरची इच्छा. उदा. लहान मुलांना शांत करणाऱ्या औषधामुळे अनेक अमेरिकन अर्भकांना घुसमटून मृत्यू आल्याने ते औषध विकण्यावर बंदी घालण्यात आली. तेव्हा ते औषध निर्यात करण्याचा प्रयत्न उत्पादक करत होते. तर आयात करणाऱ्या देशास हे कळणे जरूर होते. परंतु ३४ दिवसांनंतर रेगन राष्ट्रपती झाल्यावर त्याने हे बिल काढून टाकले. त्यामुळे अमेरिकन उत्पादकांना अत्यंत विषारी पदार्थ निर्माण होऊन अपशिष्टांतून, हवेतून, पाण्यातून जात असला तरीही त्या पदार्थाची निर्यात करता येईल. विकसनशील देशाचे लोक मेले तरी अमेरिकेला त्याची पर्वा नाही ह्याचे हे द्योतकच नाही काय ?

## बेजबाबदारपणाचे धोके

इतकेच नव्हे तर काही हजार अमेरिकन उत्पादक, विषारी अपशिष्ट निर्यात करताहेत ! नेडलॉग टेक्नॉलॉजी ग्रुप ह्या संस्थेने १० लक्ष टन अपशिष्टांची विल्हेवाट (दर वर्षी) लावण्यासाठी सिएरालिओनेने ह्या देशास २५० लक्ष डॉलर्स (दरवर्षी) देण्याचे कबूल केले ते ह्या अपशिष्टापासून कॅडमियम, जस्त, तांबे इत्यादी धातूंचे पुनरुत्पादन करण्याचा कारखाना तिथे घालणार होते. ह्या कारखान्याचे अपशिष्ट कमालीचे विषारी होते.ह्याविषयी पूर्ण मौन होते आणि हे लक्षावधी टन अपशिष्ट नेण्या-आणण्यात सांडले असते तरी हजारो लोकांचे प्राण धोक्यात ! अशा निर्यातीसाठी अनेक आफ्रिकन देशांना विचारण्यात येत असते. कारण ते गरीब आहेत.म्हणून होय म्हणण्याची शक्यता आहे.




एका मेक्सिकन माणसाने मोनोकेम ह्या अमेरिकन कंपनीचे अपशिष्ट मेक्सिकोत आणून खुशाल पाण्यात ओतून ती पिपे लोकांना विकली.'पॉलीक्लोरीनेट व य फिनाइलस्' नामक अत्यंत विषारी रसायनाचा तो साठा होता. ह्या गोष्टीची वाच्यता झाल्यावर मेक्सिकनला व त्या कंपनीच्या मालकास अटक करण्यात आली, त्या वेळी आणखी तीनशेवर पिपे येऊ घातली होती !

ह्यास कारण अमेरिकेच्या सरकारने ह्या घातुक व विषारी अपशिष्टांबाबत फार कडक कायदे केले असले तरी उत्पादकांना व कारखानदारांना त्यांच्या पालनात रस नाही. मानवी जिवाशी आपण खेळत आहोत याचे त्यांना भान नाही. कुठे तरी एक विकृत क्रौर्य मनात असावे, असे तिऱ्हाइताला वाटावे अशी त्यांची कृती असते. कारण ह्या कुणालाही स्वार्थाखेरीज काही दिसत नाही.

हूकर केमिकल व प्लास्टिक्स कंपनीने अमेरिकेतच एक प्रचंड हत्याकांड केल्याची वार्ता माहीत असेलच. एका कालव्यात (लव्ह कॅनाल) १९४७ ते १९५३ पर्यंत २१८०० टन रसायनाचे अपशिष्ट पिपात भरुन पुरून टाकले व पुढे ती जागा विकली. त्यावर शाळा बांधली गेली आणि काही हजार घरेही; पण १९७८ मध्ये एकदम हा सारा बनाव जाहीर झाला. कारण ह्या सुमारास कॅन्सरने व्याधिग्रस्त माणसे, अपमृत्यु, काही जन्मत: विचित्र व्यंग असलेली बालके जन्मणे, गर्भपात इत्यादि अनेक घटनांच्या नोंदी झाल्या, तक्रारी आल्या. लोई गिब्ज ह्या एका स्त्रीच्या पुढाकाराने सरकारला इकडे लक्ष घालावे लागले आणि पिपातून रसायने बाहेर पडली असून पाणी, हवा, माती सारा आसमंत दूषित झाला आहे असे लक्षात आले. तावडतोब ३७ कुटुंबांना हलवून वेगळी जागा दिली. शाळा हलवली आणि ऑक्सिडेंटल पेट्रोलियम कॉर्पोरेशनवर १२५० लक्ष डॉलर्सच्या नुकसानभरपाईचा खटला सरकारने भरला आहे ! आपल्याच देशबांधवांशी ह वागणूक तर गरीब देशांशी माजोरीपणे न वागतील तरच नवल.

काही ठिकाणी औद्योगिक अपशिष्टे गाळासह निर्यात करण्याची योजना आखली जाते. 'हैती' जवळील बेटातील १६,००० हेक्टर जमिनीला शेतीसाठी खत म्हणून हे

पुरवायचे ठरत होते. त्यासाठी सुरवतीला जवळजवळ १६ लक्ष डॉलर्स खर्चायलाही ही कपनी तयार होती. कारण ह्या गाळामुळे 'हैती' पुढे गाळात जाणार होती प्रदूषणाने जमीन व पाणी अत्यत विषारी ठरणार होते. काही कपन्या तर आपल्या देशातील अत्यत घातुक अपशिष्टे अशाच विकसनशील राष्ट्रांतील मोकळचा जमिनीवर वा पाण्याच्या साठयानजीक सोडण्याची परवानगी घेतात.

ह्यामध्ये सर्वाधिक धोक्याचे अपशिष्ट म्हणजे अणुत्सर्गी. सर्व अणुबाँब बनवणारी राष्ट्रे– ब्रिटन, अमेरिका, फान्स– आपले अत्यत धोकादायक अपशिष्ट महासागरात सोडत असतात; परंतु जपान आज आपल्या २१ रिॲक्टरचे अपशिष्ट पॅसिफिक मध्ये कुठे टाकावे ह्या विचारात आहे कारण जपानी अभ्यासकाच्या मते त्यानी हे अपशिष्ट ज्या ठिकाणी सोडायचे ठरवले आहे ते १॥ वर्षातच तेथून वर येईल. कारण तिथे भूकप संभवतात व जर ते वर आले तर त्या पॅसिफिकवरील बेटावर रहाणारे किमान १ लक्ष लोक कॅन्सरने मरतील ! शिवाय मासे मरतील, माशातर्फे मासे खाणाऱ्यामध्ये हा अणुत्सर्ग पोचेल, त्याना अनेक रोग होतील ते वेगळेच.

विषारी घातुक पदार्थांची निर्यात होते आहे, विषारी अपशिष्ट असलेले कारखाने अविकसित देशात काढण्यात येत आहेत. (अगदी भारतात महाराष्ट्र व गुजराथेत असे कारखाने आहेत. ) ह्यास जितके विकसित राष्ट्राचे बेजबाबदार निमुगेपण कारणीभूत आहे तितकेच विकसनशील राष्ट्राचे अज्ञान व परकीय चलनाबाबतचे धोरणही कारणीभूत आहे.

केवळ परकीय चलन मिळते आहे म्हणून स्वकीयाचे प्राण धोक्यात घालणारे हे थोर कारखानदार व राजकारणी ह्या आयातीस मदत करतात. ज्या इंजेक्शनमुळे स्त्रियाना गर्भ राहात नाही त्याचे दूरगामी धोक्याचे परिणाम सर्वज्ञात असल्याने पुढारलेल्या देशानी त्यास बदी घातली; परंतु ( भारतात सुदैवाने नाही )बहुतेक देशात ( बागलादेश पाकिस्तान, ब्रह्मदेश, नेपाळ इ ) हे वापरले जाते. स्त्रियाचे मृत्यू, कॅन्सर, अपमृत्यू, कमालीचा रक्तस्राव हे सारे चालू आहे. ही आयात बद केली जात नाही. कारण सरकार व विक्रेते लक्षावधी रुपये खातात. केनियात ह्या अपजॉन कंपनीने लाखो डॉलर्स ह्या देशात अवैध मार्गाने दिले व त्याच्या कित्येक पटीचा पैसा हे औषध विकून कमावला, हे सिद्ध झाले आहे. अमेरिकन सरकारने ह्या कपनीवर खटला भरला आहे; परतु विक्री चालू आहे !

अशी अनेक उदाहरणे देता येतील. आमच्या देशातील प्रदूषण विरोधी सरकारी व बिनसरकारी यत्रणा अधिक जागरूक बनणे आवश्यक आहे. कुठल्याही आयात करण्याच्या रसायनाचा पर्यावरणातील परिणामांचा आराखडा काढला पाहिजे व मग सुरक्षिततेच्या दृष्टीने विचार करून आयातीबाबत निर्णय घेतला पाहिजे. अन्यथा विकसित देशानी टाकलेला घातुक कचरा गोळा करायची कचराकुंडी ह्यापलीकडे अविकसित राष्ट्रांना किंमत उरणार नाही. कित्येक विकसनशील राष्ट्रे आपल्याच देशात होणाऱ्या प्रदूषणास आळा घालण्यास तयार नाहीत. कारखानदाराची बटीक झालेली राजसत्ता हवे तसे वागत असेल तर त्यावर अंकुश ठेवण्याचे सामाजिक संस्थांचे कर्तव्य त्यांनी पार पाडले पाहिजे. परकीय चलन गोळा करण्याच्या मोहात साऱ्या लोकसंख्येचे आरोग्य धोक्यात येते आहे याची जाणीव सत्ताधिशानी ठेवणे आवश्यक आहे. ह्यासाठी सामान्य माणूस अत्यंत जागरूक हवा. धाकदपटशास बळी न पडता बिनसरकारी, समाजकारणी संस्थानी ह्या विषयास वाचा फोडणे आवश्यक आहे ह्यासाठी राष्ट्रीय व आतरराष्ट्रीय स्तरावर प्रयत्न झाले पाहिजत. अमेरिकेसारख्या राष्ट्रांना कायदा करणे भाग पाडले पाहिजे. 'आम्ही काय विकत घेतो त्यास बंदी कुणी, कुठे, का घातली हे कळले पाहिजे' हा राष्ट्रप्रमुखांनी आपला हक्क मानला पाहिजे. हे लवकर झाले पाहिजे. स्टॉकहोमच्या परिषदेच्या अकरा वर्षांनंतर हे फलित असेल तर रौप्यजयंतीच्या वेळी किती राष्ट्रे एके ठिकाणी येतील ह्याविषयी माझ्या मनात संशय आहे. आता आपल्यासमोर पर्याय दोनच आहेत. तात्काळ कृती करून जिवंत राहणे अथवा अपघाती संकटात नाहीसे होणे !

## परदेशात घातुक माल निर्यात करणाऱ्यांच्या फसवणुकीच्या काही युक्त्या –

अविकसित देशात निर्यात करताना बरीच लबाडी व फसवाफसवी करावी लागते. त्यासाठी युक्त्याप्रयुक्त्या हे बडे कारखानदार वापरतात. मार्कंडोवीने त्यांची यादी दिली आहे.

१. अमेरिकन बाजारातून माल काढून घ्यावा लागला असेल तर त्या मालाचे नाव बदलणे व तो परदेशी धाडणे ! ही अत्यंत साधी सोपी युक्ती आहे.

२. ज्या वेळी नोंदणी करण्यासाठी एखादे रसायन अमेरिकन सरकारकडे दिले जाते व काही काळाने लक्षात येते (किंवा हस्तकांतर्फे समजते) की, ह्यातील विषारी अंशामुळे ह्यास नोंदणी करताना अडचणी येणार, त्या वेळी ते औषध वा रसायन मागे घेण्यात येते व 'केवळ निर्यातीसाठी' असा शिक्का मारून नोंद करतात म्हणजे आयात करणाऱ्या राष्ट्रास ह्या 'गुप्त' गोष्टी कळवायची गरज राहात नाही !

३. कीटकनाशके तयार करणारे किंवा अत्यंत भीषण धोकादायी औषधे तयार करणारे कारखाने–अमेरिकेतील कारखाना बंद करून सरळ विकसनशील देशातच हे कारखाने काढतात त्यामुळे त्यांना भाडवल, नोकरी इत्यादी सुखसोयी मिळतात.

४ ह्याहून बुद्धिवान युक्ती नेहमी करण्यात येते ती फॉर्म्युला बदलण्याची मूळ घातकी औषधात वा रसायनात एखादे प्रक्रियेत भाग न घेणारे रसायन टाकायचे. त्यामुळे विशिष्ट अणूच्या शोधात असणाऱ्या शोधकयंत्राना ह्या विषारी अणूचा शोध लागत नाही.

५. काही विकसनशील देशात (उदाहरणार्थ ब्राझील) असे नियम आहेत की, ज्या देशातून माल आला त्या देशात त्या मालास बदी नसावी. ह्यावर युक्ती अशी की, प्रथम शेजारील राष्ट्रात, (जिथे असे नियम नाहीत) निर्यात करावयाचा व तेथून ब्राझीलसारख्या देशात पुर्ननिर्यात करावयाचा. म्हणजे नियमातून सुटकाही झाली. (दोन देशाचे वाग्गोळे ! )

६. सर्वांत शुद्ध नीचपणाचा मार्ग म्हणजे मुख्य तयार मालास बदी असेल तर त्याची विविध कच्ची रसायनेच परदेशात निर्यात करावयाची व त्या देशात ती फक्त एकत्र करून विषारी पदार्थ तयार करावयाचा ! ◻

# महाराष्ट्र राज्य शेती महामंडळ, मर्यादित.

( महाराष्ट्र शासनाचा अंगीकृत व्यवसाय. )

तारेचा पत्ता : स्टेटफार्म, पुणे.
फोन नं. ५०१२८, ५०२४९,
५७९१०.

नोंदलेले कार्यालय :
२७०, भांबुर्डा,
सेनापती बापट मार्ग,
पुणे–४११ ०१६

स्थापना : १९६३

- ऊस आणि अन्नपिके मोठ्या प्रमाणावर घेणारा सार्वजनिक क्षेत्रातील आघाडीचा उपक्रम.
- सध्या ताब्यात असलेली एकूण जमीन– ( –महाराष्ट्राच्या ७ जिल्ह्यामध्ये असलेल्या १३ मळ्यांवर ) — २८१०९ हेक्टर्स
- ऊसः–
  १९८१–८२ मध्ये गळीताचे क्षेत्र. — ६१९३ हेक्टर्स
  **खरीप अन्नपिकेः–**
  १९८१–८२ मध्ये बीजोत्पादन अन्नधान्ये व हिरवळीचे पिकाचे क्षेत्र — ५०५२ हेक्टर्स
  **रब्बी व उन्हाळी हंगामी पिकेः–**
  १९८१–८२ मधील अन्न धान्यपिकाचे — ३८७४ हेक्टर्स
- क्षेत्रव्यवस्थापनेत कामगाराची सहभागीदारी.
- आधुनिक व शास्त्रोक्त पद्धतीने शेती.
- निरनिराळ्या पीकस्पर्धेमध्ये महामडळाने अनेक पारितोषिके मिळवलेली आहेत.

अधिकृत व भरणा झालेले भांडवल. — रुपये तीन कोटी ( अधिकृत ) रुपये पावणेतीन कोटी ( भरणा झालेले )

**ना. भाई सावंत,**
राज्य मंत्री, महसूल खाते व
उपाध्यक्ष, महाराष्ट्र राज्य
शेती महामंडळ, मर्यादित;
पुणे.

**ना. श्री. एस्. जी. घोलप,**
मंत्री, महसूल व पुनर्वसन व
अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य
शेती महामंडळ, मर्यादित;
पुणे.

**प्र. तु. घोगले,**
सचिव व कार्यकारी सहसंचालक.

**पी. डी. करंदीकर**
कार्यकारी संचालक

With Best Compliments From

**A. B. Associates**

1206/23/B, Shivajinagar
PUNE–411 004

Tel. 441267

With Best Compliments from

**VISION ADVERTISING**

· Saherzade

Opp. Arthur Bunder Road,
COLABA, BOMBAY 400 001

MANOOS WEEKLY ( Licensed to post without perpayment of postage–No. 11 ) Regd. No. PNCW–28

# Hindustan Ferodo Limited

( A Member of the Turner & Newall Group )

*Manufacturers of :*

" FIREFLY ", " PERMANITE and " FYSAX "

Asbestos Textiles
Asbestos Gland Packings
Compressed Asbestos Fibre Jointings
Asbestos Millboard

" LIMPET " Asbestos Sheets
" FEROBESTOS " Sheets
Flooring Sheets

" FERODO "

Brake and Clutch Linings

*Registered Office & Factory* · Lal Bahadur Shastri Marg
Ghatkopar West
Bombay 400 086.

*Sales Office :* Bombay, New Delhi, Calcutta, Madras,
Kanpur, Bangalore and Aurangabad.